

# फणा

अनंत कदम

MR
891.463
K 114 F

MR
891.463
K114F

# फणा

.... अनंत कदम

अनघा प्रकाशन, ठाणे

● प्रकाशिका :
सौ. विद्या मुरलीधर नाले
अनघा प्रकाशन
१६, सदिच्छा, मीठबंदर रोड,
चेंदणी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

Library IIAS, Shimla
MR 891.463 K 114 F
G5260

● मुद्रक :
राजेश प्रिंटटच,
११९, बोराबझार स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

MR
891.463
K 114 F

● संगणक अक्षर जुळणी :
श्री माणिक आर्टस्, ठाणे

● मुखपृष्ठ :
अमोल नाले

Indian Institute of Advanced Study
G-5260
30/10/003
Shimla

© अनंत कदम
आशा हाऊस,
नौपाडा, माणिकपूर
वसई रोड - ४०१ २०२.

● मूल्य : रु. ५०/-

श्री. कृष्णा मालटकर
डॉ. रजीन डिसिल्वा
न्या. एहेतेशाम देशमुख
प्रा. विजय तापस

- यांना

प्रेमपूर्वक

# अनंत कदम यांचे प्रकाशित साहित्य

**कादंबरी**

| | |
|---|---|
| किडे | (१९७१) |
| स्रोत | (१९७७) |
| पाखरू | (१९७९) |
| दिवसातल्या अंधारात | (१९८०) |
| कॅन्सर | (१९८२) |
| मानवी | (१९८३) |
| संवाद | (१९८४) |
| विचित्र | (१९९०) |
| रक्त | (१९९०) |
| मरण | (१९९१) |
| विद्यापीठ | (१९९३) |
| कुंपणांपलीकडे | (१९९४) |
| नामरूप | (२०००) |
| फणा | (२०००) |

**काव्य**

| | |
|---|---|
| बासरी | (१९६३) |
| ती पहाट येत आहे | (१९९५) |
| झुरते पाखरु | (१९९५) |
| हृदयताल | (१९९९) |

**इतर**

| | |
|---|---|
| धम्मपद (अनुवाद) | (१९९२) |
| माय. बाप आणि... (व्यक्तीचित्रे) | (१९९५) |
| छळ छावणीतले दिवस (अनुवाद) | (१९९९) |

**इंग्रजी**

- Thus said the Buddha (1996)
  *(Translation of the Dhammapada from Pali)*
- Pain and Pangs *(Collection of Poems)* (1996)

दुपारचं जेवण आटोपल्यावर एक घटकाभर झोप घ्यायची, ही कमळाबाईची सवय. जेवण आटोपल्यावर ती तोंड धुवून आरशासमोर आली. ही आरशात पहाण्याचीसुद्धा तिची आपली सवय. आपला चेहरा पहाणं! आपल्या डोळ्यात पहाणं!... तसंच आज तिनं आरशात पाहिलं आणि तिचं मन एकाएकी खंतावलं, उदासलं. डोक्यावरचे पिकलेले केस, चेहऱ्यावरील सुरकुत्या, समोरचे दोनतीन दात पडलेले पाहून तिला काहीतरीच वाटलं. आपण आता म्हातारी झालो, आपले दिवस संपले, आता आपली वाटचाल स्मशानाकडे, हे तिला जाणवलं. तिनं लहानपणी कित्येकदा ऐकलेला एक अभंग तिला एकाएकी आठवला. त्याचा अर्थ तिच्या मनात साकळला... ह्या देहाचा काही भरवसा नाही. तो कधीही कोसळून पडेल. तो कधीही मातीस मिळेल!.... हो, काय ह्या देहाचा भरवसा? ती मनाशीच म्हणाली. पण तरी तो किती द्वाड? देह देवाचं मंदिर म्हणतात. तरी कधी कधी हे शरीर किती घाणीत लडबडतं! ते चांगलं ठेवायचं म्हटलं तरी त्याच्यावर किती अत्याचार! ते कधी तरी मातीस मिळणार, तरी ते काय काय करतं? आपण काय काय सोसलं? काय काय भोगलं? हा देह लाभला म्हणूनच ना? आता तो जाणार! जाऊ दे! त्यानं एके दिवशी गेलंच पाहिजे. पण पोराचं? माझ्या पोराचं वाईट वाटतं.

आतल्या खोलीतून बांगड्यांचा आवाज आला तेव्हा ती आपल्या विचारातून जागी झाली. तिला एकदम राग आला. मेला तिच्याशी धुसमुसळेपणा करीत असेल. ह्या मेलीला तरी शरम! थोरली मुलगी लग्नाला आली तरी नवऱ्याला सोडून ह्या मेल्या नाम्यालाच जवळ करते.

नवरा जेवल्यावर ताटावरून सरळ उठतो आणि खाली जातो. बसतो दिवसभर त्या पिंपळाच्या पारावर! तो वेडाच झाला! गरीब पोर बिचारं! पण हा मेला नाम्या! आपली बायको ठेवलेय गावात आणि माझ्या सुनेबरोबर... मेल्याला जगाची नाय पण मनाची तरी लाज! पण ह्या साऱ्या गोष्टींना आपणच कारणीभूत! आपणच आपलं मन काबूत ठेवलं नाय. आपल्यालाच ती घाण हवी होती!... अण्णा आपल्याला सोडून गेल्यावर नाम्याला आपणच आणलं! हो, मीच! नाहीतर तो कसा येणार होता? नाम्या आपल्यापेक्षा दहा-पंधरा वर्षांनी तरी लहान! हे आपल्याला कळत होतं! आणि तरी देखील! आपल्याला लाज वाटायला हवी होती! पण हे घाणेरडं शरीर! आपल्याला लाज वाटली नाही! काही ताल-तोल राहिला नाही! तो ठेवायला हवा होता! दुसऱ्या गावातील कित्येक बायका नाही का तो तालतोल ठेऊन जन्मभर तशाच जगल्या! मला अशी काय बुद्धी झाली! असलं हे शरीर! म्हातारं होणारं! एक दिवस स्मशनात जाणारं! त्याची राख होणारं! त्याच्यासाठी एवढं मी कशाला करायला हवं होतं? पण केलं! नाम्या मला हवाहवासा वाटला. मी आंधळी झाले! तो हवाहवासा वाटायचा! काय त्याचा तो रूबाब! काय त्याचे ते नेहमी पांढरे शुभ्र स्वच्छ इस्त्रीचे कपडे! काय त्याचा तो दणकट देह! दंडही वळलेले! आणि त्यात त्याच्याकडे पैसा! त्याची स्वतःची लॉन्ड्री चांगली चालत असलेली! साड्या काय, खाणं काय, तो काही काही पुरवत होता. तो रोज अगदी हवाहवासा वाटत होता... पण मध्येच काय झालं? .. माझी सून आली! आणि ह्या लांडग्याची नजर माझ्या सुनेवर वळली!

कमळाबाई विचार करता करता अंथरुणावर लवंडली. डोळे मिटले. पण रविवारचं मटणाचं रुचकर जेवण झालेलं असतानादेखील पेंग काही येईना. जेवणाची आज रुचीही तिला कळली नाही.

तिचं डोकं घिरटलं. काय हा देह! शरीर हे देवाचं मंदिर म्हणतात! आपण त्याचं गटार केलं! ते मंदिर! पण गटार ही! आपण गटार केलं! आपण केलं का? की आपल्यावर दडपण आलं? गटार करणं किंवा मंदिर करणं आपल्या हातात होतं ना? होतं आणि नव्हतंही! खरं म्हणजे होतं!

गटार न करणं आपल्या हातात होतं! कमळाबाईला काही कळेनासं झालं.

ती काहीशी पश्चातापदग्ध झाली.

कमळाबाईच्या डोक्यात एकदम रघूचा विचार आला. तिला खूप खूप काही वाटलं... तो आता दिवसभर आकाशाकडे नुसते डोळे लावून बसेल... तिला खूप वाईट वाटलं. पोटात गलबलून आलं. अपराध्यासारखं वाटलं. आपलं चुकलं! एका भुकेसाठी आपण एका जिवाचा घात केला, बळी दिला! कसली ही भूक? कसली ही खाज? घाण नाही! पण आपण घाण केली! रघू आपल्या पोटचा गोळा! आपलं मूल! पण आपल्या ह्या भूकेपायी आपण त्याच्या मनाचा, जिवाचा विचार नाही केला! काय आहे एवढं त्या भुकेमधी? नवऱ्याकडून भूक शमवून घेतली असती तर काय एवढं नव्हतं! पण आपण गेलो भरकटत! पण आपण तरी काय करणार? जिथं सासऱ्यानंच...! आपण गेलो भरकटत! पण भरकटायला नको होतं. आपण रघूचा विचार करायला हवा होता! मन काबूत ठेवायला हवं होतं! पण मेले भेटणारे पुरुष तरी तसे असायला हवे होते ना! त्यांना हवं होतं माझं शरीर! माझं लुसलुशीत मांस! हलकट मेले! तरी आपलाच दोष! ते हलकट होते, म्हणून आपण का हलकट व्हायचं होतं? आपण आपले मालक होतो! ह्या प्राणावर तरी आपला हक्क होता! काय झालं असतं? हा जीवच देऊन टाकला असता तर रघू फक्त पोरका झाला असता! पण आज जी अवस्था त्याची आहे त्याचं कारण आपणच!.. कमळाबाईचा जीव तगमगला... रघूची पोर वीणा! रघूची कसली, नाम्याचीच ती! म्हणून तर त्यानं जिवाचा आटापिटा करून तिला परत आणली. पलिकडच्या चाळीतल्या पवाराच्या पोराबरोबर पळून गेली होती. त्याच्याबरोबर लग्न करणार होती. त्यामुळं नाम्याचं नाक कापलं जाणार होतं. कारण काय तर पवाराचा श्रीधर हलक्या जातीतला आणि हा उच्च! काय ह्याची उच्च जात! वीणा जगाला दिसायला रघूची मुलगी! पण खरी नाम्याचीच! त्याचंच ते कारस्थान! बहुतेक! पण तरी मेल्याला वीणा ही रघूचीच वाटते! कारण आपली सून ही त्याची लग्नाची बायको नाही ना! ती रघूचीच बायको! वीणा मग रघूचीच पोर! तो अलिकडे तिच्याकडे

वाईट नजरेनं बघत बसतो. नीच मेला!... पवाराचा श्रीधर किती चांगला मुलगा! चांगला शिकला सवरलाय. बँकेत नोकरीला हाय. वागणं चांगलं. आणखी काय हवं? वीणाचं लग्न श्रीधरबरोबरच व्हायला हवं. ज्याच्यावर जीव त्याच्याशीच लग्न. नाहीतर कसलं ते लग्न!

कमळाबाईनं असा विचार केला आणि एकदम तीस वर्षांपूर्वीचा काळ तिच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. एका मागोमाग चित्र सरकू लागली...

**क**मळा नुकतीच तारुण्यानं मुसमुसलेली. गोरीपान. हाडापेरानं मजबूत. कुणाच्या मनात भरावी एवढी सुंदर. डोळ्यात वीज. चालणं नागिणीसारखं. घराण्यात बाईमाणसाला शाळेचं तोंड पाहायला मिळत नसे पण कमळा सातवीपर्यंत गेली. सातवी पासही झाली. पुढं शिकण्याची इच्छा होती. पण गावात सातवीच्या पुढं शाळाच नव्हती. तालुक्याला जाऊन शिकणे हे घराण्यात मान्य नव्हतं. मग कमळा घरची कामं करू लागली. शेतावर जाणे. विहिरीवरून पाणी आणणं. आईला स्वयंपाकात मदत करणे! उरलेला वेळ पोरीबाळींबरोबर खेळणं. बस्स. एवढंच! गावात तरणी बांड पोरं खूप! पण कमळानं कुणाकडं लक्षही दिलं नाही. मनातूनही तिनं गावातील कुठल्या तरुण पोराचा विचार केला नाही. तिला तसं कुणाविषयी वाटलंच नाही. तिला कुणी ओढ लावली नाही, कुणी ओढून, आकर्षून घेतलंच नाही, त्याला ती तरी काय करणार? आणि ओढून घेतलं ते म्हारवड्यातील मनोहरनं! जीव जडला तो एकदम मनोहरवर! एकाएकी! जातीपातीचं काही एक भान राहिलं नाही. जातीचा विचार पार गळून गेला होता. मनोहरला पाहिल्याबरोबर ती स्वतःच विरघळून मनोहरमध्ये सामावून गेली.

मनोहर नुकताच तालुक्याहून मॅट्रिक होऊन आला होता. तोसुद्धा गोरागोमटा, उंच, हाडापेरानं मजबूत, देखणा. डोळ्यात काही आगळीच चमक. चेहराही सतेज. त्याच्या डोळ्यात, चेहऱ्यातही काही वेगळे भाव!

त्यावरून त्याचं चांगलं मन, हृदय कमळाला खोल कुठंतरी जाणवलं. तिथंच ती मनोहरशी आतून बांधली गेली.

मनोहरची एक बैलांची जोडी होती. ती घेऊन तो नदीवर आला होता. बैलांना धुवून, पाणी पाजून तो पायवाटेनं चालला होता. समोर कमळा डोक्यावर घागर नि कमरेत कळशी घेऊन येत होती. समोरासमोर येताच ती दोघंही काहीशी थबकली. त्याचे पीळदार दंड, त्याचा देखणा चेहरा तिच्या डोळ्यात आला. ती त्याच्या डोळ्यात आली. दोघंही एकमेकांच्या नजरेत मिसळली, गुरफटली. काही क्षण दोघं एकमेकांच्या डोळ्यात डुंबली. काही तरी खोल मनात जाणवलं. नंतर एकदम काहीतरी झालं. त्यांच्या चेहऱ्यावर कसलेतरी भान उमटले. खडबडून जागे झाल्यासारखे त्यांचे चेहरे झाले. ती दोघं भांबावल्यागत विरुद्ध दिशेनं चालू लागली. पाय जड झालेले. तरी ते विरुद्ध दिशांना सरकत होते. दोघांच्याही डोळ्यात एकमेकांचे डोळे!

दोघांनाही हृदयात काहीतरी झालं. कसलीतरी हुरहुर लागली. ओढ! दोन हृदयांची ओढ! आणि दोघांनाही जाणवलं की दोन हृदयांमध्ये कातळी पहाड आहे, निर्दय भिंती आहेत! त्यांना ओलांडणे कठीण! दोघांनाही हे जाणवलं! तरी ओढ बुझली नाही.

त्या रात्री दोघंही एकमेकांच्या डोळ्यात.

दुसऱ्या दिवशी त्याचवेळी दोघांची गाठ पडली. नदी शांत होती. नदीवर कुणी चिटपाखरु नव्हतं. पुन्हा तशीच नजरानजर. पुन्हा हृदयात ते कसंसंच होणं.

काही दिवस अशीच नजरानजर.

मग काही दिवस नुसतंच स्मित करणं.

मग काही दिवस दुरूनच लोकांच्या नकळत थोडसं बोलणं.

त्यानंतर मग एकदम रानात गुपचूप भेटी.

वर्षभर भेटी चालल्या.

कमळीचा उफाड्याचा देह पाहून बाप मनातून काळजी करू लागला. हे वय आणि असला देह फार धोक्याचा! त्यानं कमळीच्या लग्नासाठी खटपट सुरु केली. एकदोन स्थळं आली. कमळीला एकही पसंत पडलं नाही. ती फारच अस्वस्थ झाली. एक दिवस मनोहरला तिनं साऱ्या गोष्टी सांगितल्या. एकदम शांतता पसरली. रानही शांत होते. तसं निशब्द बसणं असह्य वाटत होतं आणि जास्त वेळ बसणंही शक्य नव्हतं. शेवटी कमळा चिंतायुक्त स्वरात उद्‌गारली -

"मनोहर!"

"हं!" मनोहर नुसताच हुंकारला. काय बोलावं हे त्याला कळलं नाही. खूप काहीतरी जाणवलं. मन अंधारल्यागत झालं. ताटातूटीची कल्पनाही सहन होण्यासारखी नव्हती. पण तरी... आपल्यापायी कमळाचा जीव धोक्यात नको, आपल्यापायी तिला त्रास नको... त्याला वाटलं.

"काय करायचं बोल ना?" कमळा अधीरतेनं म्हणाली.

"काय बोलायचं?"

"इकडे बघ मनोहर... तुझ्याशिवाय मला... तुझ्याशिवाय कुठल्याही पुरुषाचा मी विचार..." तिला बोलावलं नाही.

"मला कळतं... पण इकडे बघ... माझी जात... ती ह्या समाजाच्या दृष्टीनं हलकी... तू उच्च जातीतली..."

"मनोहर, ही जातबित मला नाय रे कळत! तू हलक्या जातीतला बितीतला मला नाय रे वाटत. तुझं वागणं, तुझी टापटीप, तुझं सरळपण... तुझी कशी रे मग जात नीच?... मी नाही मानत असल्या जाती! मनोहर मला तू हवा आहेस? तुझ्याशिवाय दुसरा कुणी नको! असं का झालं कळत नाय! मी कुठंही यायला तयार आहे. कुठंही राहायला तयार आहे. जातीचा विचार का आणलास रे मधेच?.."

"मी आणला नाही ग. पण हे लोक... !"

"लोकांना जाऊ दे... मला तसं वाटत नाही ना! खरोखर मला वाटत नाही. तू दुसऱ्या कसल्या जातीचा आहेस, मी कसल्या दुसऱ्या जातीची

आहे, असं खरोखर, खरोखर वाटत नाही...''

''खरंच?''

''खरंच!!''

दोघांच्या डोळ्यांत पाणी तरारलं.

त्यांचा बेत पक्का झाला.

एका पहाटेच ती दोघं गाव सोडून पसार झाली.

मध्यान्ह झाली आणि गावात ती वार्ता वाऱ्यासारखी पसरली. ज्याच्या-त्याच्या तोंडी कमळी व मनोहरचा विषय. कमळी व मनोहर ह्यांना बोलताना काही बायकांनी बरेच दिवस पाहिलं होतं. काही लोकांनी त्यांना रानातून येताना देखील पाहिलं होतं. कमळी आणि मनोहर सकाळपासूनच आपापल्या घरातून नाहीशी झाली होती. हे लोकांच्या ध्यानात येताच लोक काय समजायचं ते समजलं.

विश्वासराव गावातला एक मोठा जमीनदार. त्याचा दराराही मोठा. गावातील जाणती-सवरती, पुढारी मंडळी जमली. धावाधाव झाली. एक जीप आणली गेली. सात-आठ तरणेताठे गावकरी तिच्यात बसले. विश्वासराव ड्रायव्हरजवळ बसला. एका आडदांड तरण्या पुढाऱ्यानं धीर देणाऱ्या स्वरात म्हटलं -

''विश्वासराव, काय भिव नका वो! तुमची पोर दिवे लागनीच्या आत आनली नाय तर मिशा काढून देन!''

त्या पुढाऱ्याच्या आवाजात बोलणाऱ्या तरण्या माणसानं दोन्ही हातानं आपल्या मिशा पिरगाळल्या.

सभोवती जमलेली पोरंबाळं, पोरीबाळी त्याच्याकडं कौतुकानं, काहीशा आदरानं पाहात होती. ते पाहून तो तरणाबांड माणूस मनातून स्वतःवर खुष झाला होता.

जीप भरधाव सुटली.

रात्रीच्या गाडीची तिकिटं मिळाली. दिवस कसा काढावा, हा प्रश्न होता. तालुक्यात उघड फिरणं धोक्याचं होतं. दिवसभर कुठंतरी लपून राहाणं आवश्यक होतं. एक दिवसापुरती कुठंतरी खोली मिळणंही कठीण

होतं. कमळी व मनोहर एक दोन घटका धडधडत्या उरानं भिरभिरली. अखेर एक खोली मिळाली. भितभित कावऱ्याबावऱ्या डोळ्यांनी खोलीत प्रवेश केला. संध्याकाळपर्यंत त्यांना वेळ घालवायचा होता. मुंबईस पोचल्यानंतर सर्व धोके टळणार होते. कायदेशीर लग्न केल्यावर ती दोघं पोलिसांचं सहाय्य घेणार होती. मनोहरचे बरेच नातेवाईक, जातवाले वगैरे मुंबईत होते. गावापेक्षा मुंबईतलं जीवन सुरक्षित होतं. मुंबईत सर्व आव्हानांना तोंड द्यायची त्याची तयारी होती. फक्त रात्री एस्.टी.च्या बसमध्ये बसायला हवं. ती सुटायला हवी. दोघांची मनं भयग्रस्त विचारांनी भेडसावली होती. संध्याकाळ लवकर टळायला हवी, असं त्यांना वाटत होतं. पण प्रत्येक क्षण अगदी सावकाश सरकतोय, असं वाटत होतं.

संध्याकाळ टळणार नव्हती.

बरोबर चारच्या सुमारास दरवाज्यावर थाप पडली. दोघांचं अवसानच गळलं.

सर्व संपलं, मनोहरला जाणवलं. भयंकर काहीतरी वाटलं. दोघांचीही मनं एकदम अंधारून आली. हृदयं थरथरली. ओठ कापू लागले. अंगंही थरथरू लागली. काय करावं, हे सुचेनासं झालं. हृदयात काहीतरी दाटून आलं. काहीतरी हरवलं जाण्याच्या दुःखाची त्यांना जाण झाली. ती दोघं एकमेकांकडे काही वेळ हताशपणे नुसती पहात होती.

दरवाज्यावर थापा पडत होत्या. त्यांचं त्यांना भान नव्हतं.

थापा वाढल्या, मोठ्या झाल्या तेव्हा मनोहरनं हताशपणे दाराची कडी काढली. दार उघडलं गेलं आणि एकदम मनोहरच्या पोटात जोरात दणकट लाथ बसली. कळ मस्तकात गेली, तरी तो उभा. मग ठोसे आणि लाथा ह्यांचा नुसता वर्षाव. शिव्यांच्या वृष्टीसहीत.

कसा बसा आपल्या मणगटाच्या ताकदीवर मनोहर तेथून जीव वाचवण्यास सटकला. कमळीला टाकून पळणं बरोबर नव्हतं. एवढ्या लोकांसमोर दोन हात करणंही शक्य नव्हतं. एवढ्या मनःस्थितीतही त्यानं विचार केला...

कमळी भयकंपित उभी. दगडासारखी. डोळे कावरेबावरे. हताश. विश्वासरावानं तिचे केस धरले आणि तिच्या कमरेत एक लाथ हाणली.

तिला भयंकर कळ आली. पण ती कळ आतल्या आत दाबून तोंडावाटे एक उच्चारही न काढता ती दगडासारखी खाली कोसळली. तिच्या डोळ्यांसमोर फक्त काळोख. तिला काहीएक जाणवलं नाही.

दोघा पुढाऱ्यांनी लागलीच विश्वासरावाला आवरलं. बाकीच्यांनी कमळीला उचललं आणि तिला ते खोलीबाहेर घेऊन गेले. त्यापाठोपाठ विश्वासरावही पिसाटल्यागत बाहेर पडला.

जीप सुरू झाली.

दिवेलागणीच्या आत कमळीला घरी आणण्याचा शब्द पुरा झाला होता.

विश्वासरावानं लागलीच कोंबड्या कापायला लावल्या. बाटल्या मागवल्या. पुढाऱ्यांची रात्रभर पार्टी चालली होती. विश्वासरावाने झोपताना एक मोठा सुस्कारा टाकला. घराण्याची, जातीची अब्रू वाचली होती! जात बुडण्याचं टळलं होतं!

कमळी रात्रभर झोपली नाही. कमरेत लाथा बसल्याचं दुःख झालं नाही. पण आपलं काही खूप खूप मोठं हरवल्यासारखं तिला वाटत होतं. आपलं सर्वस्व वाहून गेल्यासारखं वाटत होतं... एका जातीपायी!

रात्रभर तिचे डोळे झरत होते.

**दु**सऱ्या दिवशी मारुतीच्या देवळात गावकऱ्यांची बैठक बोलावली गेली. जन्या तासकराला म्हारवड्यातून बोलावून आणलं गेलं. त्याला देवळाच्या बाहेर पडवीत बसायला सांगितलं गेलं. तो कांबळं टाकून पडवीत बसला.

बैठकीला सुरवात झाली.

जो तो तोंडास येईल ते बोलू लागला. कुणाची आपसात बाचाबाची झाली. सर्व गोंधळ. गोंधळ इतका वाढला की कोण काय बोलतोय हे कुणालाच कळेनासं झालं. शेवटी गावचा सरपंच वैतागून ओरडला तेव्हा लोक शांत झाले. सरपंच जन्या तासकराला उद्देशून म्हणाला -

"जन्या इकडं बग. तुज्या मुलानं गावाचा मोठा गुन्हा केला हाय."

लागलीच लोकांमधून आवाज उठले.

"इच्या भैनला, आमच्या पोरी काय उघड्यावर पडल्यायत काय पळवून नेयाला?" एक आवाज.

"त्याच्या पोराला आता गावात तर पाऊल टाकू द्या. त्याचे हातपाय तोडून बावीतच टाकून देऊ."

"ह्या फुडं आमच्या पोरींवर कुनी नजर तर टाकून बगा. एकेकाचे डोळेच काढून ठेऊ."

जन्या तासकर थरथरत होता. एवढ्या लोकांसमोर आपण काहीच करू शकत नाही, ह्याची त्याला कल्पना होती. काय बोलावं हे त्याला कळतच नव्हतं. तो काहीच बोलला नाही. लोकच तोंडाला येईल ते बोलत होते. सरपंचानं सर्वांना गप्प केलं आणि तो जन्याला म्हणाला -

"जन्या, ह्या फुडं तुज्या पोरानं गावात पाऊल ठेवता कामा नये."

"ठीक हाय, सायेब." जन्या गयावया करून म्हणाला.

नंतर सरपंच मोठ्या न्यायाधीशाचा आव आणून म्हणाला, "मंडळी, जन्याचा तसा काय दोस नाय. पण त्याच्या मुलाचा हाय. त्याच्या मुलानं गावाची, आपल्या जातीची अब्रू घालवण्याचा प्रयत्न केला हाय. थोडीशी अब्रू गेलीय. तर जन्यानं अब्रूनुकसान भरपाई म्हणून गावपंचाइतीस एकावन रुपये दंड द्यावा. दुसरी जन्याला शिक्षा काय करायची? त्याचा तसा दोस नाय."

"बरोबर. बरोबर हाय!"

"पन दंड झालाच पायजेल!" लोक ओरडले.

"सायेब, एकावन रुपये मी गरिबानं कुठून आनायचे?" जन्या काकुळतीला येऊन म्हणाला.

"अरं भडव्या, शेताचा एक तुकडा विकून टाक!" कुणीतरी ओरडला.

कोण ओरडला त्याच्याकडे लक्ष न देता जन्या सरपंचाला उद्देशून म्हणाला, "साहेब, आता शेताचे दोनच तुकडे उरलेत हो!"

सरपंचाला जन्याची काहीशी दया आली. तो म्हणाला, "बरं, मग

आता तुज्याकडं किती पैसे आहेत?''

''आता पाचच रुपये हायत.''

''मंडळी, काय हरकत नाय. पाच रुपये तर पाच रुपये. पण जन्यानं दंड हा भरायलाच पाहिजे.''

जन्यानं कनवटीमधून पाच रुपये काढून सरपंचाला दिले.

''जन्या, ऊठ, जा आता. ह्याच्याफुडं असं होता कामा नये. तुझा पोर ह्या गावात दिसता कामा नये. हवं तर तूसुदा गावाबाहेर जा, तुझी इच्छा आसल तर! हिथं ऱ्हायचं असलं तर हिथल्या रिवाजाप्रमाणं ऱ्हायला हवं!''

''नाय तर तंगड्या तुटतील!'' कुणीतरी ओरडला.

जन्या मान खाली घालून चालता झाला.

बैठक संपल्याचं सरपंचानं जाहीर करताच सर्व लोक भराभर उठले.

**क**मळीचं प्रकरण गावभर झालं. कित्येक दिवस लोकांमध्ये कमळीविषयीच चर्चा. एक-दोन शाळेतल्या मैत्रिणी सोडल्या तर गावात तिच्याविषयी कुणालाच सहानुभूती वाटली नाही. काय काय घडलं, कोण काय म्हणालं, हे सारं कमळीला ह्या मैत्रिणींमार्फत कळत होतं. तिला वाईट वाटायचं. मनातून धुसमुसायची देखील. पण लोकांची तोंड कोण बंद करणार? सारी बोलणी, साऱ्यांचं विचित्र नजरेनं पहाणं, त्यांचं वागणं सहन करण्यावाचून मार्ग नव्हता. ती दगडासारखी होऊन मैत्रिणी सांगतील ते शांतपणे ऐकायची.

कमळीचं प्रकरण नुसतं गावभर झालं नाही, तर ते गावाच्या बाहेरही गेलं होतं.

कमळीचं लग्न जमणं आता कठीण होतं. तरी विश्वासरावाला खात्री होती की तिला कुठून तरी चांगलं स्थळ मिळणारच. उभ्या गावात कमळीसारखी देखणी, रूपवान पोर नव्हती! आणि हाडापेरानं भरलेली! सर्व शरीर रेखीव! आणि पोर कुणाची? - विश्वासरावाची! एका

जमीनदाराची ! त्यात हातात खूप पैसा ! पैसा असल्यावर काय घडू शकणार नाही ? असा विचार करून विश्वासराव आत्मविश्वासाने कमळीच्या लग्नासाठी खटपट करीत होता. मुलगा कसाही असो, पण खानदानी घराण्यातलाच असावा, म्हणजे पुरे ! काहीही करून पोरीला कुणाच्या तरी गळ्यात बांधून द्यायची. अशी पोर घरात नको. काहीतरी व्हायचं. एकदा लग्न लावून दिलं की मग काय घडणार नाही ? लग्न लावून दिलं की आपण सुटलो ! - विश्वासरावानं पक्का विचार केला होता. त्याच्या गावोगाव चौकशा, विचारपूस चालली होती.

एक दिवस नांदगावचे रावसाहेब शिंदे अचानक विश्वासरावाकडे धडकले. डोक्यास झक्क फेटा बांधलेला. शुभ्र धोतर आणि खमीस, त्यावर स्वच्छ कोट. साठी उलटलेला, केस, मिशा पांढऱ्या झालेल्या, तरी शरीरयष्टी उंच - ताठ ! डोळ्यात रग ! रावसाहेब जवळजवळ पंधरा वर्षांनी विश्वास-रावापेक्षा मोठा. तरी त्याची विश्वासरावाशी मैत्री ! जुनी मैत्री ! दोन गावांमध्ये दहा कोसांचं अंतर ! म्हणून भेटी कधीतरी ! रावसाहेब बऱ्याच दिवसांनी विश्वासरावाकडे झुकला होता.

सर्व विचारपूस झाली. रावसाहेबानं फेटा, कोट वगैरे उतरवलं. गुळाच्या खड्यावर पाणी घटाघटा प्यायला. आणि हुश्श करून ओटीच्या भिंतीला टेकून बसला.

विचारपूस झाली. इकडच्या तिकडच्या चारदोन गोष्टी झाल्या. थोडेसे नेहमीचे विनोद झाले. आतमध्ये जेवणाला सुरवात झाली. अर्थात कोंबडी कापली गेली होती.

विश्वासरावनं रावसाहेबासमोर बाटली ठेवली, तेव्हा कमळी घरातून दोन ग्लासं घेऊन ओटीवर आली. कमळीला रावसाहेबानं जिभल्या चाटल्यागत पाहिलं आणि विश्वासरावास विचारलं -

"अरे ही कोण रे?"

"माझी मुलगी! आणि कोण असणार?"

"तुझी मुलगी?"

"होय, माझीच!"

"नक्की?"

"काय रावसाहेब!... अहो नक्की माझीच!"

कमळी लागलीच आत गेली. तिच्याकडे पहात रावसाहेब मोठ्यानं म्हणाला, "मग जमलंच!"

रावसाहेबाच्या गढूळ डोळ्यात पहात विश्वासराव शंकित स्वरात म्हणाला, "काय जमलं?"

"माझ्या मुलासाठी!" डोळे निर्मळ करण्याचा प्रयत्न करीत रावसाहेब म्हणाला.

"ठीक आहे!" सुस्कारा टाकित विश्वासराव म्हणाला.

"ह्याच वर्षी बार उडवून द्यायचा."

"चालेल."

"पक्कं?"

"पक्कं!"

दाराआडून त्यांचं संभाषण कमळी कान लावून ऐकत होती. तिला ते आवडलं नाही. त्या म्हाताऱ्या रावसाहेबाच्या डोळ्यास डोळा भिडवला तेव्हाच त्याच्या डोळ्यातले त्याचे ते भाव तिला आवडले नाहीत. त्याच्या डोळ्यातलं काहीतरी घाणेरडं तिला लागलीच जाणवलं. तिनं लागलीच नजर फिरवून घेतली. नंतर त्याच्या डोळ्यात तिनं पाहिलंच नाही. आतून ती फारच अस्वस्थ झाली.

आई स्वयंपाक-घरात जेवण करण्यात मग्न होती. आईजवळ जाऊन ती दबलेल्या स्वरात म्हणाली, "आई, कोण ग तो म्हातारा?"

"रावसाहेब म्हणतात त्याला."

"आई, तो कसातरीच ग बघत होता माझ्याकडं!"

"तो हायच मेला हलकट!"

कमळी गप्प बसली.

आईच्या त्या उद्‌गारानं तिला जिवावरची धोंड उतरल्यासारखं वाटलं.

जेवणं झाली.

रावसाहेब संध्याकाळी निघून गेला.

कमळीची आई त्या रावसाहेबाबरोबर जास्त बोलली नाही. निरोप द्यायलाही स्वयंपाकघरातून बाहेर आली नाही.

रात्रीचं जेवण आटोपल्यावर कमळीची आई विश्वासरावाला ताडकन म्हणाली-

"त्या रावसायबाच्या घरात माझी पोर द्यायची नाय!"

"का? काय झालं?" विश्वासरावानं विचारलं.

"काय झालं?.. तुम्हाला काय माहीत नाय?"

"पण काय?"

"त्याची बायको कशानं वारली?"

"हार्ट-आटॅकनं!..."

"ते सारं खोटं!... तिनं धसका घेतला! तिला ह्या रावसाहेबाचं घाणरेडं वागणं आवडलं नाय. त्यापेक्षा मरण पत्करलं, म्हणून ती झुरून झुरून मेली!..."

"कसलं त्याचं घाणरेडं वागणं?"

"स्वतःचा भाऊ मेला ते तो विसरलाच. पण त्याच्या येड लागलेल्या बायकोवर त्यानं अत्याचार केला. तिचं पोट वर आणलान्. सर्व गावभर होऊ नये म्हणून एका रात्री तिला कुठं सोडून आला. सोडून आला की मारून आला! काय सांगावं?... अशा राक्षसाच्या घरात माझी पोर?"

"अगं, माणसाच्या हातून होते कधीतरी तशी गोष्ट. पुन्हा ती तो करणार हाय काय? आणि त्याच्याशी काय करायचंय तुला? त्याचा पोरगा चांगला असला म्हंजे झालं. तो मिलिटरीत हवालदार हाय. आता मेजर हवालदार होणार हाय. घरात शेतीवाडी खूप हाय. मोठा वाडा हाय. शिवाय रावसाहेब पोलिसपाटील. सर्व तालुक्याला त्यांचा दरारा हाय! असल्या घरात आपली पोर पडतेय!"

"मला माझी मुलगी नाय द्यायाची ह्या घरात."

"तू चूप बसशील का आता. मी शब्द दिलाय. मला ते घराणं पसंत हाय. मला कुणी आडवं येता कामा नये. पोरीला काय कमी पडणार हाय? उगाच मूर्खपणा करू नको." विश्वासराव डरकाळी फोडून म्हणाला.

कमळीची आई गप्प बसली. गप्प बसणं भाग होतं. तिला विश्वासरावाच्या दणकट मनगटांची ताकद ठाऊक होती, अनुभवली होती.

कमळी काही झालं तरी तिची मुलगी होती. तिच्या पोटचा गोळा होता. एकच्या एक पोर! कमळी सुखी व्हावी हीच आईची इच्छा होती. तिची तळमळ होती. पण सुख म्हणजे नुसता पैसा नव्हे, आणि नवरा म्हणजे नुसतं शरीर नसतं, नवरादेखील एक चांगलं माणूस असावं, हे तिला मनोमन पटलं होतं आणि हे चांगलं माणूस कुठल्याही जातीच असू शकतं, मनोहर खरोखर चांगला होता. पण त्याची जात आडवी आली! आपण कमळीचं त्याच्याशीच लग्न लावून दिलं असतं. पण विश्वासरावापुढं आपण काय करणार? आपण तोंडही उघडू शकले नाही. ते एक जनावरचं! - कमळीच्या आईनं विचार केला.

कमळी दगडासारखी बसली होती. विश्वासराव बाहेर गेल्यावर आईनं तिला आतल्या खोलीत घेऊन खूप समजावलं...

"कमळे, तू मनोहर बरोबर लग्न केलं असतंस तर मला आनंद झाला असता! पण बघ, मी काय करणार? तू ह्यांना सापडली नसतीस तर बर झालं असतं!"

"आई, मी आता सारं सहन करायचं ठरवलंय..."

"बघ, पण माझ्याविषयी तुझ्या मनात..."

"तुझ्याविषयी माझ्या मनात काही एक शंका नाही..."

"पण हे लग्न मला पसंत नाय,... जीव द्यावासा वाटतो...तुला ते विहीरीत लोटून देत आहेत, असं वाटतं. फार फार वाईट वाटतं. माझ्या डोळ्यांनी हे लग्न पाहवणार नाय. जीव द्यावासं, वाटतं."

"आई, असं करायचं नाही... मी सहन करीन... आता माझं काय राहिलंय... बापाच्या अब्रूसाठी मी तयार आहे... केवळ माझ्या बापाच्या

अब्रूसाठी...''

"तुझा बाप?"

"असा प्रश्न का केलास?"

आई गप्प बसली.

"सांग ना असा प्रश्न का केलास?"

आई गप्पच.

"सांगायचं नाही?"

"सांगू का?"

"सांग ना!"

"ऐकणार ना?"

"एवढं काय आहे?"

"भयंकर! ऐकशील?"

"मी आता लहान नाही. सहन करायची ताकदही आलेय. न ऐकवणारं देखील ऐकेन."

आई गप्प झाली. सारं मन एकवटून ती म्हणाली.

"ऐक तर... कमळे, अग मीही तुझ्यासारखी सातवी पास झाले होते. त्या काळी! पुढं शिकायची इच्छा होती. पण बाप ऐकला नाही. तुझ्यासारखीच रूपवान होते. तुझ्यासारखं माझंही मन बसलं एकावर. पण बापानं मला बांधलं ह्या जनावरापाशी, अडाण्यापाशी! तो शिकलेला होता, देखणा होता. पण गरीब होता. बापानं ह्या विश्वासरावाची फक्त इस्टेट पाहिली, पैसा पाहिला. नुसता पैसा म्हणजे सुख का? पैशासाठी लग्न ते खरं लग्न का? माझं मन ह्या विश्वासरावानं कधी पाहिलं नाही. मग त्याचं कसलं प्रेम? त्याला फक्त माझं शरीर हवं होतं. नुसतं ओरबाडून घ्यायचा. आपलं मन नसलं, आपली इच्छा नसली तरी त्याला ते अर्पण करायचं. नाही केलं तर मणगटाची तो ताकद दाखवायचा. कधी मारझोडही. नेहमी धाक. अंगावर माझ्या किती दागिने! पण मी नुसती एक पुतळी! जीव उरला नव्हता! मन राहिलं नव्हतं. नवरा-बायकोच्या संबंधात जो आनंद असतो तो नव्हता. सर्व यंत्रासारखं चांगलं होतं. एक वर्ष झालं. दोन वर्षे

झाली. तीन वर्षे झाली. पण काही नाही. मी वांझ म्हणून त्यानं तक्रार करण्यास सुरवात केली. कारण तो पुरुष ना! घरंदाज! त्याच्यात कसं काय कमी असणार! बायकोमध्येच कमी असणार!... आणि एक दिवस अचानक त्याची गाठ पडली!''

''कुणाची?'' कमळी मध्येच उद्गारली.

''ज्याच्यावर माझं मन बसलं होतं त्याची. त्याचंही माझ्यावर खूप खूप प्रेम होतं. योगायोगानं चांगला एकांतही होता. राहवलं नाही. अगदी एकदाच. अगदी एकदाच घडलं. आणि तू माझ्या पोटात आलीस! हे मी कधी कुणाला कळू दिलं नाही कुणालाच! तुला मी हे सांगतेय. तुला सांगायला नको होतं. सांगून तुला दुःख दिलं. माफ कर.''

कमळी काही वेळ अवाक्‌च झाली.

''कमळे, माझ्यावर तू रागावली असणार! होय ना?''

''मुळीच नाही.''

''मग काय वाटतं?''

''असं व्हायला नको होतं! त्याच्याबरोबरच तुझं लग्न व्हायला हवं होतं!''

''त्याची गरिबी आड आली.''

''कसली लग्नं ही?'' कमळी उबगून उद्गारली.

नंतर एकदम शांतता पसरली.

आईनं दिवा मालवला.

आई झोपली. विश्वासराव तर केव्हाच घोरू लागला होता. कमळीचा डोळा लागला नाही. मनोहरची आठवण पुन्हा पुन्हा दाटून येत होती... त्याचं हसणं, त्याचं ते जीव ओवाळल्यागत पहाणं, त्याचा स्पर्श, त्याचं बोलणं, सारं सारं आठवत होतं. त्याच्या व्यतीरिक्त दुसऱ्या पुरुषाशी शरीरसंबंध म्हणजे तिला घाण वाटली. पण ती घाण सहन करावी लागणार! आपल्या मनाविरुद्ध पुरुषाचा स्पर्श! आणि त्यालाच नाव लग्न! ... तिला काहीतरीच वाटलं.

रात्रभर ती तळमळत होती. रात्रभर मनोहर डोळ्यात. कोंबडा आरवला.

Indian ... G-5260 30/10/2003

तिचे डोळे खिडकीकडे लागलेले. सताड उघडे. हळूहळू आकाशात तांबडंही फुटलं. तरी तिचा डोळा लागला नाही.

**म**हिन्याभरातच पुढच्या हालचाली झाल्या. रीतीरिवाजाप्रमाणे मागणं आलं! रावसाहेबाबरोबर आणखी दोनतीन म्हातारे आलेले. एकानं कुंडल्या समोर ठेवल्या. त्या जमल्या! दुसऱ्यानं "कुठले तुम्ही माने? तुमची आई कोणाची? तुमची पणजोबी कोणाची?" वगैरे वगैरे कुळाचा इतिहास विचारणारे प्रश्न विचारले. आणि कुळं एकदम जमली! राहिला प्रश्न शीलाचा! पण कुळ चांगलं असलं की शील चांगलं असतंच! शीलाची कुणी चौकशी केली नाही! ज्या जमायला हव्या होत्या त्या गोष्टी जमल्या हे पाहून रावसाहेबाला समाधान वाटलं. साखरपुड्याचा दिवस ठरला.

साखरपुडा झाला, मुलाचा पत्ता नसतानाही! कमळीनं त्याचं तोंडही पाहिलं नसतादेखील! साखरपुड्याला नवऱ्या मुलाची काही जरूर नसते!

साखरपुड्याचा कार्यक्रम आटोपल्यानंतर मायलेकी एकांतात गळ्यात गळा घालून रडल्या. त्यांनी मनं मोकळी केली -

"आई, तू काही काळजी करू नकोस. मी सारं सहन करीन. मी आता दगडच झाले आहे. तू काही अविचार करू नकोस. तू माझ्यासाठीतरी जग. तूच एक माझा आधार." कमळी म्हणाली.

"कमळे, मी तुला कधी अंतर देणार नाही ग!"

"एवढंच कर."

"पण कमळे नाही पटत ग हे!"

"सोडून दे ग सारं! मला तरी पटतं का हे?... हे बघ... मनोहर माझ्या हृदयातून कधी जाणार नाही... तरी सारं मी हे सहन करणार... केलं पाहिजे!... तुझ्यासाठीही... तुला त्रास नको..."

"अग माझ्या मनाला त्रास होणार! ... पण बघ कशी ही माणसं... !

हे गावातील पुढारी! हा विश्वासराव! माझा नवरा! तो सरपंच! तो रावसाहेब! हे पुढारी! हलक्या जातीतील सुंदर पोरगी शेजेला चालते! काय काय केलं आहे ह्यांनी, ह्या ह्या पुढाऱ्यांनी... पण लग्नात मात्र जात आडवी येते.''

''आई, नको बोलू! मला चांगलं कळलं!''

त्या दोघी दगडी पुतळ्यासारखी रात्रभर बसून होत्या.

**सा**खरपुड्याच्याच दिवशी लग्नाचा मुहूर्त ठरला होता. साखरपुड्यानंतर अवघ्या तीन दिवसांनीच लग्न होतं.

रावसाहेबानं अगोदरच मुलाला तार करून बोलावलेलं होतं. मुलगा दोन महिन्यांची रजा घेऊन बरोबर वेळेवर आला होता.

लग्न धुमधडाक्यानं झालं.

विश्वासरावानं कमळीला चार तोळ्यांचं मंगळसूत्र, दहा तोळ्यांचा हार, पाच तोळ्यांचा बांगड्या, वगैरे वगैरे खूप दागिने घातले. कमळीला दागिन्यांचं काहीएक वाटलं नाही. दागिन्यांचं तिला फार फार ओझं वाटलं! पण ते सहन करण्याचा तिनं निश्चय केला! लोकांमध्ये मात्र ज्याच्यात्याच्या तोंडी ''असा जोडा उभ्या गावात नाही!'' ज्यानं त्यानं खूप खाल्लं होतं. जिलेब्या काय, लाडू काय, वडे काय! तीनचार दिवस जेवणंच! पुढाऱ्यांनी तर पार्ट्याच झोडल्या तीनचार दिवस! कोंबड्या आणि दारूच्या बाटल्या! मग ज्याच्यात्याच्या मुखी विश्वासरावाच्या मुलीविषयी स्तुतीच!

कोण काय विरुद्ध बोलणार?

उमदा, देखणा, उंच बांध्याचा, तिच्या शरीराला शोभेल असा नवरा कमळीला मिळाला, हे ज्याच्या त्याच्या तोंडी! पण कमळीला त्याचं काहीएक वाटलं नाही! तिला काहीतरी खूप मोठं हरवल्यासारखं वाटत होतं. हृदयाला एक रुखरुख लागली होती. मनोहरला आता वास्तविक विसरायला हवं

होतं. पण तोच नेमका आठवत होता! असं वाटायला नको, असा तिनं विचार केला. त्याला मनातून काढून टाकायचं, त्याला आठवत राहाणं चांगलं नाही, ती मनात म्हणाली, तिनं निश्चय केला. पण तरी आतून त्याचीच ओढ!

त्याला आपल्यामुळे परागंदा व्हावं लागलं, ह्याची रुखरुख काही केल्या जाईना!

नवऱ्यानं लाकडासारखं जवळ घेणं, धुसमुसळ्यासारखं वागणं, गिधाडासारखं आपल्यावर तुटून पडणं, प्रेमाचा लवलेश नाही, सारं रानटीपण, ह्या गोष्टींनी तिला उबगच आला. तिला मनोहरचीच आठवण यायची! तो कसा प्रेमानं जवळ घ्यायचा! कसा डोळे ओतून पाहायचा! त्याच्या स्पर्शातही किती हळूवारपणा! त्याचे डोळे कसे थबथबलेले! त्याच्या डोळ्यात प्रेमाचा डोह थबथबलेला! आणि इथं एकच गोष्ट! इथं डोळ्यात फक्त आपलं शरीर! आणि काय त्याचं ते वागणं? हेच का माणूसपण?.. मग जनावरं बरी! बरी नव्हे चांगली!.. तिच्या मनात विचार येऊन जायचे.

पण काही इलाज नव्हता. तो नवरा होता. लग्नाचा नवरा! सर्व विधीपूर्वक झालेला! जातीमान्य! समाजमान्य! मग?... तिचं शरीर ही त्याची हक्काची मालमत्ता!

महिन्याभरातच तिनं साऱ्या गोष्टी अंगवळणी पाडल्या. ते भागच होतं. इलाज नव्हता.

आपलं शरीर ही नवऱ्याची मालमत्ता! नवऱ्याची! त्याची हक्काची मालमत्ता होती! लग्न झालं होतं ना! त्यानं हक्क गाजवला! फक्त शरीरावर! माझ्या मनाचं काय? - मनोहर तसा कधी वागला नाही. त्यानं माझ्या मनाच्या राज्यावर राज्य केलं! तो माझ्याशी एकरूप झाला! हा एकरूप कधी झालाच नाही! झालाच असता तर मी मनोहरला विसरले असते! पण तो झालाच नाही! होणार नाही! आपण होणार नाही! पण हे शरीर मात्र त्याला अर्पण करीत राहायचं! मागणी करील तेव्हा! मागणी तरी कुठं करतो? अगदी ओरबाडणं! हल्ला! दांडगाई! क्रूरता! हे सारं सहन करायचं! तो नवरा ना! लग्नाचा! विधीपूर्वक!

- कमळी खूप विचार करायची. सर्व बाजूंनी तिचं मन गोंधळून गेलं होतं. पण एवढ्या गोंधळातही तिनं निश्चय केला होता. जगायचं! सर्व सहन करायचं! पदरात पडेल ते अनुभवायचं. पहायला मिळेल ते पहायचं.

मनोहरबरोबर आपण सुखी झालो असतो, असं तिला वाटलं. पण त्याची जात आडवी आली. तो त्या कुटुंबात जन्मला म्हणून ती जात! पण तो किती चांगला! किती प्रेमळ! कसा स्वच्छ! नाहीतर आपला नवरा! सवयी घाणेरड्याच! कितीतरी अस्वच्छपणा! कपडे घाणेरडे चालतात. हात न धुताच तो जेवायला बसणार! उष्टा हात भांड्याला लावणार! पण मनोहरचं तसं नव्हतं! पण तो हलक्या जातीत जन्मलेला, आणि हा नवरा उच्च जातीत! तो खालच्या आणि हा वरच्या! खालची जात आणि वरची जात!... तिला कळेनासं झालं.

काही दिवस तिला मनोहरच्या आठवणी यायच्या. तिनं मनोहरचा विचार केला. नंतर तिला कळलं. मनोहरला आठवण्यात, त्याचा विचार करण्यात काही अर्थ नव्हता. तिनं मग त्याला विसरायचं ठरवलं. त्याला विसरणं कठीणच होतं. तरी त्याची भेटच काय त्याला भेटण्याचीही इच्छा करायची नाही, असं तिनं ठरवलं. नवऱ्याशी आपण कधीच एकरूप होऊ शकणार नाही, तरी त्याच्यासाठी फक्त शरीरापुरतं उरायचं, असा तिनं विचार केला.

दीड महिना झाला आणि तार आली.

रजा संपण्यापूर्वीच नवऱ्याला जावं लागलं. लढाईला एकाएकी तोंड लागलं होतं. रजेवर आलेले सारे सैनिक भराभरा गावातून निघून गेले.

नवरा गेला त्याचं तिला काही एक वाटलं नाही. नवऱ्याविषयी असावी ती ओढच नव्हती.

पण आठवड्यातच तिला एकदम कंटाळा आला. घरात ती, सासरा आणि एक गडी. तिला काहीतरीच वाटायचं. आईची आठवण यायची. आईची ओढच लागली. रावसाहेबाला विचारून ती चार दिवसांसाठी माहेरी आली.

कमळीला पाहून आईच्या डोळ्यात पाणी आलं. दोघींना काहीतरी जाणवलं. त्यांनी एकमेकींना मिठ्या मारल्या.

उजाडता उजाडताच कमळी कमरेत कळशी नि डोक्यावर घागर घेऊन निघाली. नदीच्या काठावर उंबराच्या झाडाखाली विहीर तुडुंब भरली होती. पूर्वेला डोंगरावर आभाळ लालभडक झालं होतं. सूर्य वर यायला अजून वेळ आहे. ती एकटीच. अद्याप पाणी भरायला कुणी एक बाई आलेली नाही. वातावरण अगदी शांत शांत. फक्त पाखरांची किलबिल आणि कोंबड्यांचं आरवणं.

कमळीनं शांतपणे झरझर कळशी घासली, धुतली. प्रथम कळशी भरली, नंतर घागर. आणि निघाली. अद्याप वाटेवर कुणी दिसत नव्हतं. वातावरण अद्याप निवांत होतं. ती संथ पावलांनी उभा गाव डोळयात साठवित, आठवणी आठवीत चालली होती. अगदी संथ !

काही अंतर चालून गेल्यावर तिला कुणाची तरी चाहूल लागली. जन्या तासकर उंच बांधाखालून डोक्यावर एक ट्रंक घेऊन आडव्या वाटेनं येत होता. कमरेत जुनाट पंचा. अंगात फाटलेला अंगरखा. डोक्यावर जीर्ण फेटा. चेहऱ्यावर भयंकर वेदना. अफाट काहीतरी हरवल्याचं दुःख.

कमळी एकदम थबकली. जन्या तासकराच्या चेहऱ्यात पाहिल्यावर तिचं हृदय पिळवटून आलं. जन्याही जवळ आला. तो पार थकलेला वाटला.

"बाबा !" कमळीच्या तोंडून हुंदका टाकल्यागत उद्‌गार बाहेर पडला.

जन्याला आश्चर्य वाटलं. आपल्याला, एका महाराला, ह्या पोरीनं 'बाबा' म्हणावं, ह्याचं आक्रीतच वाटलं. ह्या गावात असं नव्हतं कधी घडलं ! सारी अपमानकारक चित्रं त्याच्या डोळ्यांवरून सरकली. म्हारवड्याच्याबाहेर मान साध्या पोरानंही दिला नव्हता!... कमळीकडं तो काही वेळ पहातच राहिला. हृदय गहिवरून आलं. तो गद्‌गद् उद्‌गारला-

"कमळे !"

काही वेळ नुसती निशब्दता. कुणाच्या तोंडातून शब्द फुटेना.

"कुठं चाललात?" कमळी म्हणाली.

"सासरवाडीला, हा गाव सोडून! हिथं ऱ्हान्यात अर्थ नाय. बायको तिकडंच हाय."

"गाव सोडून?" काहीशा शंकित स्वरात कमळीनं विचारलं.

"हो."

"का?"

"हिथं काय ऱ्हायलंय आता. सर्व फुकट झालं आयुष्याचं! पोर चांगलं शिकलं व्होतं. हुशार व्होतं. पन फुकट झालं सारं. फुकट झालं. फुकट झालं." जन्या काही वेड्यासारखा पुटपुटत राहिला. कमळी त्याच्याकडं पाहातच राहिली. काय बोलावं हे काहीवेळ तिला सुचलंच नाही.

"म्हणजे?" ती भयकंपित स्वरात म्हणाली.

"तुला म्हाइत नाय काय?"

"खरोखर नाही."

"मनोहरनं जीव दिलान्."

"काय?" ती किंचाळली.

कमळीच्या कमरेतली कळशी निसटली. तिनं ती लागलीच सावरली. डोक्यावरची घागर थरथरत होती, ती देखील शरीरावर ताबा ठेऊन तिनं स्थिर केली. लोकांमध्ये आणखी काही बभ्रा व्हायचा, ह्या जाणिवेनं आलेला हुंदका तिनं मोठ्या कष्टानं दाबला.

"इष पिऊन जीव दिलान्." अश्रू गाळीत जन्या म्हणाला.

"कधी झालं हे?"

"तुजं लग्न झालं त्या दिवशीच!"

कमळी डोळ्यातली आसवं थोपवू शकली नाही. बांध फुटलाच. घळघळा डोळ्यातून आसवं वाहू लागली.

"रडू नको बाय कमळे, रडू नको. झालं ते झालं. तुज्याविषयी माज्या मनात कदी काय येनार नाय. जा, जा, कुनीतरी बघंल. जा. मी चलतो..."

कमळीनं लागलीच डोळ्यांना पदर लावला. डोळे पुसलं आणि म्हणाली-

“बाबा,... पण तुमच्याविषयी मला कसं कळणार?”

“अग माज्याइषयी तुला काय कळायचं?... कशासाठी? तुला रोज कळवलं असतं. पण बग... साधं बोलायची चोरी!... जात.. जात!..”

“माज्या मनात नाय ती!”

“गावातील लोकांच्या मनात अजून हाय ना! त्यात हे असं झालं!... विसर सारं... दुःख करू नकोस पोरी...”

“पण तुमच्या खाण्यापिण्याचं?...”

“हायत हातपाय! करू काबाड कष्ट!”

कमळीचं हृदय ढवळून आलं. तिनं चटकन पोलक्यात हात घातला. आतला रुमाल बोटांनी विसकटला, त्यातली घडी करून बारीक केलेली शंभरची नोट काढली. सभोवार एकवार दृष्टी फिरवली. अद्याप कुणीच माणूस नव्हतं. तिनं झटकन ती नोट जन्याच्या हातात कोंबली आणि ती चालू लागली.

जन्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे कितीतरी वेळ पहात होता.

कमळीला पाऊल उचलवत नव्हतं. सर्व रिकामं रिकामं वाटत होतं. सासरी गेल्यानंतर, इथं नको, सरळ विहीरीत उडी टाकून जीवन देऊन टाकायचा... ती मनात म्हणाली.

एकेक पाऊल मणासारखं जड. ती खूप वेळानं अंगणात आली. आई धावत आली.

“अगं, इथं माहेरपणाला आलेयस की माझं पाणी भरायला आलेयस? अगं, माझे हातपाय अजून मजबूत हायत हो! तू जरा इथं सुख घे! सुख कसलं मेलं! पण माझ्याकडून तरी!”

असं म्हणून आई हसली.

आई मस्करी, विनोद करण्याच्या हेतूनं म्हणाली. कमळीही हसेल असं तिला वाटलं. पण कमळीला हसू आलं नाही. आई काय बोलली हेही तिला कळलं नाही. तिचं डोक बधिर झालं होतं. तरी मनास सारं हरवल्यासारखं वाटत होतं. सार संपल्यासारखं! सारा काळोख! त्यात वाटही हरवलेली!

असं काही तरी वाटत होतं.

कळशी, घागर आई घरात ठेऊन आली तरी कमळी पडवीतच वेड्यासारखी बसून राहिली. अगदी कळेनासं झालं होतं.

आईलाही काहीतरी वाटलं. तीही नुसती तिच्याकडे पहातच राहिली. काही वेळ नुसती निशब्दता. आणि एकाएकी कमळीच्या पोटात ढवळून आलं. तिचा चेहरा काहीसा आक्रसला.

"काय होतंय ग?" आईनं काळजीयुक्त स्वरात विचारलं.

"चक्करल्यासारखं वाटतंय."

एवढं म्हणाली आणि कमळी बकाबका ओकली.

थोडयावेळानं ओकणं थांबलं.

आईला मोठं समाधान झालं.

कमळीलाही पोटात काहीतरी जाणवलं. पण आईला जे समाधान झालं, ते झालं नाही.

तिला चीडच आली. शिसारी वाटली. पोटातला अंकूर हा घाणेरड्या माणसाचा आहे हे जाणवल्यावर तर तिला जिवाचाच उबग आला. एकदम मनोहर तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. मनोहर त्याच दिवशी, आपल्या लग्नाच्याच दिवशी गेला!... एक चांगलेपण गेलं! त्याच दिवशी... तिला जाणवलं... आणि आपण राहिलो. त्याला राहवलं नाही. आपल्याशिवाय जगणं त्यानं झुगारलं! केव्हढा जीव त्याचा आपल्यावर! काय भावना ही? काय त्याचं मन! आपणही जीव द्यायला हवा होता. लग्ना अगोदरच आपण विहिरीत उडी टाकायला हवी होती... तिला चुकल्यासारखं वाटलं. एकदम अपराध्यासारखं वाटलं. एकदम असह्य झालं सारं! तिनं जीवनच संपवण्याचा निश्चय केला. ती तीरासारखी उठली.

आणि एकाएकी तिच्या पोटात काहीतरी झालं. पोटात काहीतरी जाणवलं. तिचे हातपाय एकाएकी गळले. पायात चालायचंही त्राण उरलं नाही.

पोटात एक जीव!... तिचं मन म्हणालं.

तिच्या मनाचा गोंधळ उडाला. मन पिसासारखं भिरभिरलं.

ती काही वेळ नुसती उभी!

हळूहळू तिचा त्वेष ओसरला.

ती जड पावलांनी उंबरठा ओलांडून घरात शिरली. आईनं कवट-पोळी व भाकर ताटात वाढली होती. डोळे चटकन पदरानं पुसून ती शांतपणे ताटावर बसली. तिने भाकरीचा नुसता एक तुकडा उचलला आणि मनोहरच तिच्या डोळ्यांसमोर आला. घास तोंडात टाकला, पण तो घश्याखाली काही उतरेना!... त्याचं ते चांगलेपण डोळ्यांना दिसायला हवं होतं, निदान राह्यला तरी हवं होतं, त्याच्याविषयी ऐकायला तरी यायला हवं होतं! एवढं चांगलेपण उगाचच अकाली मातीत गेलं! आपल्यामुळं! आपल्यामुळं! आपल्यामुळं??..पण मनोहरनं तसं जायला नको होतं! तसं करायला नको होतं!

कमळीनं खूप विचार केला. एक घास कसाबसा घशाखाली लोटला आणि ती ओकारी करण्याच्या निमित्ताने ताटावरून उठून गेली.

आई काहीच बोलली नाही. नुसती पहात राहिली.

**ल**ढाई संपली. नवरा आलाच नाही. पंधरा दिवसांनी एक पत्र आलं. रावसाहेब कितीतरी हंबरडा काढून रडला. कमळीही रडली. पोटात नऊ महिन्यांचा गोळा! आयाबायांनी तिचं जसं करतात तसं खूप सांत्वन केलं!

हे सांत्वन, ते सांत्वनाचे शब्द, किती निरर्थक, किती शुष्क असतात, हे तिला जाणवलं. ते माहीतही होतं! कुणी मेल्यानंतर हे असं देखावा करून वागायचंच असतं, हे तिला माहीतच होतं. पण खरं म्हणजे तिनंच तिचं सांत्वन केलं होतं. ती रडली. रडायलाच हवं होतं. तिला तसं वाईटही वाटलं होतं. कुणीही माणूस मरावं, असं तिला कधीच वाटलं नव्हतं. नवराही माणूसच! तो मेला! काहीतरी वाटलं! वाईट वाटलं. पण रडावसं वाटलं नाही! तरी ती रडली! जनरीत! रडावं, खूप रडावं असं तिला दुःख

झालंच नाही! पण लोकांसाठी ती रडली! आणि लोकांच्या, नात्यांच्या रडारडीत तिला जाणवलं - जग म्हणजे देखाव्यांचा बाजार! डोळ्यातून आसू काढताना ती आतून मनात हसत होती, गावातील आयाबाया, नातेवाईक ओढून ताणून आसवं काढताना पाहून!

आणि पंधरा दिवसांनी ती बाळंत झाली.

मुलगा झाला!

दुःखात बारसं वगैरे काही करण्याची गरज नव्हती.

पण रावसाहेबाच्या रक्तात मोठेपणाची सणक!

त्यानं बारसं मोठ्या थाटामाटात केलं. सर्वांना आमंत्रण! सर्व गाव, सर्व नातेवाईक एखाद्या लग्नसमारंभाला यावेत तसे लोटले.

भेटी!.. कितीतरी!... विश्वासरावानं मुलाच्या गळ्यात पाच तोळ्याचा सोन्याचा कंठा घातला! ते पाहून कमळीला काहीतरीच वाटलं! एवढ्या कोवळ्या गोळ्याच्या गळ्यात पाच तोळ्याचं सोनं! तिला असह्य झालं! केव्हढं ओझं त्या कापसासारख्या बाळावर! तिच्या मनावर फारच मोठं ओझं आलं! तिच्या उरावरच काहीतरी जड जड ओझं आल्यासारखं वाटलं.

पण ती काहीच करू शकली नाही.

नंतर जेवणं.

एका मागून एक पंक्ती उठत होत्या.

शेवटी म्हारवड्यातील मुला-माणसांची पंगत!

आणि ते त्या लोकांना ह्या लोकांचं वाढणं!

अगदी वरून! परत हिडीसफिडीस!

तिच्या मनाला टोचलं! कुठंतरी टोचलं!... तीही माणसंच ना? तिनं तिच्या मनाला विचारलं, आणि आतल्या आत तिनं आपलं मन कुरतडून घेतलं.

ती ते गोडधोड त्या दिवशी मुळीच जेवली नाही.

मुलाचं बारसं झालं.

नाव ठेवलं गेलं. नाव - रघुनाथ! पण नंतर त्याचं झालं रघू! शेवटी तेच राहिलं. सर्वांच्या तोंडी! रघुनाथ कायम अर्धा राहिला! -- रघू.

कमळीला आयुष्य म्हणजे ओसाड वाळवंट वाटत होतं. घर म्हणजे स्मशान.

पण रघू चालू लागला, बोलू लागला, दुडदुडू धावू लागला, तेव्हा तिचं मन जगण्यात रमू लागलं. त्याच्या हसण्याला हसून साथ द्यावी लागायची. तो पडला, तर धावत जायची. तो रडला, तर त्याला खाऊ, पिऊ देऊन उगी करायची. तिचं मन काहीसं रिझू लागलं. रघूला जगवायचं, हा विचार तिच्या मनात ठाम झाला. रघूला जगवायचं, आपणही जगायचं!... तिला जगावसंही वाटू लागलं. रघूसाठी आयुष्य काढण्याचा तिनं निश्चय केला.

रघू वाढत होता.

एकेक दिवस जात होता.

आणि एक दिवस विपरीत घडलं.

कमळी एकटीच! तिच्या आईनं रघूला दोनचार दिवसांसाठी गणपतीसाठी नेलं होतं. मध्यरात्र उलटून गेली होती. बाहेर पाऊस धो धो कोसळत होता. गडद अंधार दाटून राहिला होता. कमळीला गाढ झोप लागलेली होती. तरी झोपेतच तिला कुणाच्यातरी हातांचा स्पर्श झाला. त्या पाठोपाठ अंगावरून हात फिरले. ती लागलीच खडबडून जागी झाली. तेवढ्यात तिला घट्ट मिठी पडली. तिनं जोरानं हातपाय झाडले. खूप धडपड केली. पण मिठीतून तिची सुटका झाली नाही. ती मिठी एवढी जबरदस्त होती! तिला मिठी मारणाऱ्याच्या मनगटांचीही ताकद समजली. तिनं आणखी जोरदार प्रयत्न केला. लाथा झाडल्या. काही उपयोग नाही हे जाणून तिनं ओरडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तिच्या तोंडावर हाताचा पंजा घट्ट बसला आणि त्या काळोखात हलक्या आवाजात पुरुषी आवाज रेकला...

"इकडं बग, ओरडण्याचा प्रयत्न केलास तर ठार करून नदीत टाकून देईन."

कमळीनं आवाज ओळखला. तिनं मानेला हिसडा देऊन पंजातून सुटका केली. ती जळफळून म्हणाली, ''कोण, मामंजी?''

''हो, मीच.''

''तुला शरम नाही वाटत म्हातारड्या?''

''कमळे, जास्त बोलूच नकोस.''

त्यावर कमळीनं सर्वशक्तीनीशी रावसाहेबावर लाथा हाणल्या. त्याचे बोचकारे काढले. पाचदहा मिनिटं झटापट झाली.

नंतर कमळी बेशुद्ध पडली.

ती जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा तिला एकदम घाण वाटली. सासऱ्याची शिसारी आली. त्याला हवं होतं ते त्यानं आपण बेशुद्ध असतानाही लुटून घेतलं. त्याच्या नरडीचा घोट घ्यावासं तिला वाटलं. तरी ती हताशल्यागत पडून राहिली. खूप खूप काही वाटलं. वाईट वाटलं. घाण वाटली.

**स**काळ झाली.

आंघोळ आटोपून ती बाहेर आली.

सासरा आरामात विडी ओढतोय हे पाहून तिच्या मस्तकात शूळ उठला. तिनं बाजूचं पायताण घेतलं आणि त्वेषानं त्याच्या अंगावर जाऊन त्याच्या दोन थोबाडात हाणल्या.

''नीचा, स्वतःच्या मुलाच्या बायकोवर... मेल्या, तुला काही वाटलं कसं नाही... डुक्कर मेला... नीचा, तुला महारोग होईल!...''

रावसाहेब तिरमिरला. हातातली विडी कुठल्या कुठं उडाली. तो काहीच बोलला नाही. तो दगडासारखा तसाच बसून राहिला.

''नीचा तुझ्यावर किडे पडतील!'' पुन्हा कमळी गरजली.

''कमळे!''

''तुझं अंगअंग सडेल! तुझ्या जिभेतही किडे पडतील! घाणेरडा मेला,

महारोग, महारोग होईल तुला!"

"कमळे... महारोग होऊ दे, किडे पडू देत मला.. चालतील. पण मी काय करू? राहावलं नाही!... बायको मेल्यापासून असाच राह्यलो..."

"म्हणून स्वतःच्या मुलाच्या बायकोवर, ...नीचा!"

"माफ कर... नाय राहवलं.."

"जायचं होतं कुठं... जायचं वेश्येकडं... घाणीत...पण मुलाच्या बायकोवर...आपल्या मुलीवर?.. मुलाची बायको तुझ्या मुलीसारखीच ना?... मेल्या जनावर आहेस की माणूस!... तू माणूस ना?..."

"ह्यापुढं असं होणार नाय, हे घर, ही सारी इस्टेट तुझ्या नावावर करतो. मला काय करायचंय हे सारं. सारे पैसे तुझ्या स्वाधीन करतो. पण तोंड बंद कर, बंद ठेव..."

"आग लाव तुझ्या इस्टेटीला, तुझ्या पैशाला!" कमळी कडाडली.

"इकडे बघ, गावात कुणाला कळता कामा नये. माझी तुझी बेअब्रू होता कामा नये. घराण्याची अब्रू राखली पायजेल!"

"झडली तुझ्या घराण्याची अब्रू! अशी घराण्याची अब्रू! अशी ह्या घराची अब्रू! आता ह्या घरात मला राहायचंच नाही. तुझं तोंड पाहाण्याचीही माझी इच्छा नाही."

कमळीनं आपले सारे कपडे, दागिने ट्रंकेत घातले. सारी आवराआवर केली आणि सरळ ती माहेरी निघाली रावसाहेबाकडे तिनं ढुंकूनही पाहिलं नाही.

कमळीला अंगणात पाहून आईला आश्चर्य वाटलं.

"सासऱ्याची वागणूक चांगली नाही. मला त्या घरात राहायचं नाही." ह्या पलिकडं तिनं आईस काही सांगितलं नाही. घाणेरडं घडलं होतं. पण ते घाणेरडं आईस सांगायचं कसं? जाईल ते दडवलेलं, दडपलेलं, असं तिला वाटलं होतं.

दीड महिना उलटला आणि कमळीला हादराच बसला.

मग ती गोष्ट आईला सांगणं भागच होतं.

आईला धक्का बसला. ती चक्रावूनच गेली. तिनं रावसाहेबाला खूप शिव्याशाप दिले. पण नुसते शिव्याशाप देऊन काही भागण्यासारखं नव्हतं, ह्याची तिला जाणीव झाली. काही तरी करायलाच हवं होतं. काय करायचं हे तिला माहीत होतं. पण ती गोष्ट कुठं करायची, कशी करायची, कोणाकडून करायची, हे मात्र सुचत नव्हतं.

विश्वासराव नुसता मूग गिळून, थोबाडात मारल्यागत बसला होता. आपल्या बायकोपुढं तोंड उघडण्यास त्याला जागा नव्हती. आलेला प्रसंग भयंकर होता. घराण्याच्या अब्रूचा प्रश्न होता. ती गोष्ट झाकून, दडवून टाकायलाच हवी होती.

तोही काय करायचं, ह्या गोष्टीचा विचार करीत होता.

गावात ही गोष्ट कुणालाच कळता कामा नये, ह्याची कमळीची आई काळजी घेत होती. लवकरात लवकर कुठंतरी कमळीची पाठवण केली पाहिजे, असा विचार करून तिनं कमळीच्या दिराला तार केली.

पण बायकांच्या नजरा घारीसारख्या! असं काय असलं की त्यांना चटकन् कळतं! कमळीच्या आईला वाटलं होतं दोनचार दिवसात कमळीचा दीर येईल, तिला रात्री किंवा पहाटेच घेऊन जाईल म्हणजे प्रश्न मिटला! पण कमळीचा दीर येण्याअगोदरच कमळीला दिवस गेल्याची वार्ता दोन्ही गावात वाऱ्यासारखी पसरली.

मग ती गोष्ट कुणापासून लपवण्यात काही अर्थच नव्हता. झालेली गोष्ट विश्वासरावाला, कमळीला, आईला मान्यच करावी लागली. तसं गावातल्या माणसानं कुणी विचारलं नाही. बायका येत, पहात, कुजबुजत जात. कमळी, आई, विश्वासराव ह्या सर्वांच्या माना खाली! कमळीला मेल्याहून मेल्यासारखं झालं होतं.

कमळीचा दीर, नवऱ्याच्या पाठचा भाऊ, रजा घेऊन आला. कमळीनं त्याच्या कानावर गोष्टी घातल्या. त्याच्या अंगाचा भडका उडला. पण तो शांत राहिला. काहीएक न बोलता तो कमळीला घेऊन गेला.

घरी पोचल्याबरोबर त्यानं बापाच्या दोन मुस्कटात भडकावल्या. आणि तो आक्रोशून ओरडला.

“नीचा, डुकराच्या पोटी जन्मायला हवा होतास! गावात, समाजात तोंड दाखवायला जागा ठेवली नाहीस! आणि कसला हा समाज?... तुला नुसतं रावसाहेब, रावसाहेब करून मुजरा करतो! तो हा समाज! तू रावसाहेब! काय तुझी इस्टेट, काय तुझी जमीन, काय तुझा तो पैसा! त्यामुळे तू मोठा! त्यामुळे तुला मान! तुझं नाव! पण सर्व घाण आहे तुझ्यात! आणि घाण असणाऱ्या माणसाला जर हा समाज मान देत असेल तर मी थुंकतो ह्या समाजावर! तुझ्यावर तर थुंकतोच! नीचा! डुकरा! माणसाचा तरी देह तू धारण करायला नको होतास! जायचं होतं कुठंतरी! पण सुनेवर! ती तुझी मुलगीच! अरे, स्वतःच्या मुलीवर?... समाज तुला मानतो! तो मानतो तुला तुझ्या पैशासाठी, तुझ्या इस्टेटीसाठी! अशा समाजाची, अशा जातीची मी पर्वा करीत नाही! तुझी घाण सहन करणारा समाज, तुझी जात मी मानत नाही! थू, त्या समाजावर, थू त्या जातीवर! थू तुझ्यावर! काय करील तुझा समाज माझं! माझा हा देह मारून टाकतील! एवढंच ना! माझा मोठा भाऊ तिकडे लढाईत मेला! मी वाचलो! आणखी लढाई होईल! मलाही गोळी लागेल! किंवा बॉम्बच्या स्फोटात मीही जाईन! मला मरणाची भीती नाही! पण हे असलं जगणं म्हणजे मरणं वाटतं! हलकटा, निर्लज्जासारखा परत जगतोस! लोकांना भेटायला शरम वाटत नाही?”

कमळीचा दीर मोठ्याने ओरडला आणि त्यानं बापाच्या कमरड्यात एक जोरात लाथ हाणली.

रावसाहेब कळवळला.

बापाला लाथ मारायला नको होती, बापाला मारायचं नसतं, त्याला वाटलं. असला नीच आपला बाप असला म्हणून काय झालं? असल्या नराधमांना बाप असो, काका असो, भाऊ असो, कुणीही असो ठारच केलं पाहिजे!... त्यानं विचार केला. त्याला वाटलं बापाला खलास करून टाकावं. पण त्यानं आणखी विचार केला. हत्या नको! हत्या कधीही नको! एवढं झालं तेवढं पुरे! ह्या घरात मात्र कधी पाऊल ठेवायचं नाही.

एवढा निश्चय करून तो घराबाहेर पडला. आज जायचं कुठं? कुणाकडं जायलाही तोंड राहिलं नव्हतं. काय करावं तेही सुचत नव्हतं. तो पुन्हा आपल्या खोलीत येऊन बसला. एक दिवस थांबायलाच हवं होतं. गावकऱ्यांचा निर्णय ऐकायला हवा होता.

रावसाहेब आपल्या मुलाच्या बोलण्यानं अर्धमेला झाला होता. मान खाली घालून त्यानं काही वेळ विचार केला.

नाक वर करून चालण्याची ताकद नव्हती तरी तो उठला आणि चालू लागला. गावातील म्हाताऱ्या, वडीलधाऱ्या मंडळींना तो भेटला. रावसाहेब एक तर पोलिस-पाटील, त्यात खूप शेती. हातात भरपूर पैसा. त्यानं दारू, खाणं-पिणं, आणि पैसा ह्यांच्या जोरावर एकेकाला खूष केलं. फिरण्याचा, भटकण्याचा, भेटी-गाठी घेण्याचा कार्यक्रम मध्यरात्रीपर्यंत चालला.

दुसऱ्या दिवशी देवळात गावकऱ्यांची बैठक भरली.

अर्धा एक तास कुणी काही बोललं नाही. सर्व शांत. बोलायचंच तर आपसात इकडचं तिकडचं. मूळ प्रश्नावर कुणी बोलेचना. वास्तविक रावसाहेबानं जे केलं ते कुणालाच मान्य नव्हतं. तो गावाला एक डाग होता. तो त्यांच्या जातीलाही डाग होता. तो अपराध गुप्तपणे झाला असता तर चाललाही असता! पण ही गोष्ट गावभरच झाली नाही तर इतर सर्व गावांना कळली.

"आपन कशाला जमलो हावो ते तुमाला म्हाइतच हाय. झाली गोष्ट होऊन गेली. त्यावर आता बोलन्यात अर्थ नाय. असं व्हयाला नको होतं. पन झालं गावाला हा कलंक हाय. रावसायेब गुन्हेगार हाय! पन रावसायेब आपलंच लेकरू ना! त्याला काय मारायचं? पन गुन्हा करनाराला शिक्शा झालीच पायजे. मग बोला काय शिक्शा देयाची?" - अखेर एका ऐंशी वर्षाच्या म्हाताऱ्यानं तोंड उघडलं.

कुणीच काही बोललं नाही. कुणी रावसाहेबाकडनं पार्टी झोडली होती, तर कुणी पैसे घेतले होते! तर कुणाची रावसाहेबाशिवाय कामे होणं शक्य नव्हतं. ही माणसं त्याच्याविरुद्ध बोलणं शक्यच नव्हतं. जी माणसं रावसाहेबाची कसल्याही प्रकारची मिंधी नव्हती ती फारच गरीब आणि

सज्जन, शांतवृत्तीची होती. गावच्या राजकारणात त्यांना मुळीच रस नव्हता. ती नितीशील होती. रावसाहेबानं जे काय केलं ते त्यांना मुळीच पटलं नाही. त्यांना ते फार घाणेरडं वाटलं. त्यांना मनातून चीडही वाटली. रावसाहेबाला शिक्षा व्हायलाच हवी असं त्यांना मनातून वाटलं. त्यांच्यापैकी एकाला तर असं वाटलं की रावसाहेबाच्या तोंडाला डांबर फासून त्याची गाढवावरून धिंड काढावी! पण तोही काहीच बोलला नाही. त्यांच्यापैकी कुणीच काही बोललं नाही. कारण ते संख्येने फारच थोडे! अवघे चारपाच लोक! चारपाच लोक उभ्या गावासमोर काय करणार? त्यांचं कोण ऐकणार? - असा त्यांनी विचार केला आणि बोलून उगाच रावसाहेबाशी वाईटपणा कशाला ओढवून घ्यायचा? - असा दुसराही विचार केला.

कुणी काही बोललं नाही.

सर्व गप्प.

कुणी काही एक बोलत नाही हे पाहून आपल्या पांढऱ्या मिशांवर हात फिरवून म्हातारा म्हणाला -

"कुनी बोलत नाय?... बरोबर! कसं कोण बोलणार? रावसाहेबही आपलंच लेकरू! झाला अपराध! आनि त्याला शिक्शा काय करायची?... मी सांगतो शिक्शा! ऐका..."

सर्व शांत झाले. म्हातारा थांबला.

चारपाच गरीब लोकांचा तो गट एका कोपऱ्यात बसला होता. त्यातील एक दुसऱ्याच्या कानात अगदी हळूच कुजबुजला - "काल रावसाहेब म्हाताऱ्याच्या ओटीवर बसून शंभराच्या नोटा मोजत होता!" ऐकणाराने डोळे विस्फारून नुसती मान हलवली.

म्हाताऱ्याने सर्व मंडळीवरून एक नजर फिरवली. मंडळी आपल्या मुठीत आहे हे हेरून तो म्हणाला, "रावसायेबानं पंचाइतीला एकशे एक रुपये दंड द्यायचे. कमळीला पंढरपूरला धाडायचं. सोबत कुनीतरी धाडायचा. तिथला सर्व खर्च रावसायबानं करायचा. खुद्द रावसायबानं तीर्थ-यात्रेला जायचं. गंगेत न्हावून शुद्ध होवून यायचं. तीर्थयात्रेवरून आल्यावर त्यानं सत्यनारायणाची महापूजा घालायची. गावाला नारायणाचा प्रसाद देयाचा!

हे सर्व मंडळीला मान्य हाय?''

त्यावर लोक ओरडले, ''ठीक हाय, ठीक हाय! मान्य हाय!''

लागलीच रावसाहेबाचा मुलगा गरजला, ''असल्या जनावराला फासावर चढवायला पायजे. त्याला चाबकानं फोडायला पायजे. पण तुम्ही त्याला तीर्थयात्रेला पाठवताय! आणि नंतर सत्यनारायण! काय तुमचा न्याय! चांगला आहे तुमचा न्याय! असला न्याय असला की कुणीही उठावं आपल्या सुनेवर, मुलीवर हात टाकावं! मग सत्यनारायण! आग लावा तुमच्या न्यायाला!''

तो तसाच उठून घरी आला.

कमळी रडत होती.

तो तिला म्हणाला - ''वहिनी, रडू नकोस. गप हो. मी आहे ना. मी तुझा दीर नव्हे. मी तुझा भाऊच आहे. गप हो. मन शांत कर. काहीतरी केलं पायजेल. मी करीन. सर्व काही ठीक होईल. झालं ते झालं. तुझा काय अपराध? मनातून काढून टाक ते! विसर सारं. उद्या सकाळी आपण इथून निघायचं.''

तिनं रडू आवरलं.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे कुणाचाही निरोप न घेता त्यांनी गाव सोडला.

सारा गाव झोपेत बुडाला होता.

**धा**कट्या दिरानं तिला सरळ मुंबईला अण्णाच्या खोलीवर आणलं. अण्णा त्याचा गाववाला. अण्णा जवळजवळ पस्तीशीतला. त्याच्यापेक्षा जवळजवळ आठदहा वर्षांनी मोठा. पण त्याच्याशी मैत्री! त्याच्यावर त्याचा विश्वास! म्हणून तो सरळ कमळीला घेऊन त्याच्या खोलीवर धडकला. विश्वासाने! अण्णानंही त्यांचं मोठ्या हार्दिकतेने स्वागत केलं. खूप दिवसांनी ते भेटत होते. अण्णानं त्याला कडकडून मिठी मारली. अगदी कडकडून!

पण अण्णाच्या मनात मात्र काहीतरी ढवळलं. कमळीकडे पाहिल्याबरोबरच त्याला काहीतरी झालं. काहीतरी वाटलं. पण त्यानं ते सारं दाबून आतमध्ये गाडून टाकलं आणि धाकट्या दिराला कडकडून मिठी मारली.

अण्णानं आपली खोली व्यवस्थित ठेवली होती. घरात तो एकटाच! बायको, मुलं गावी! घरी शेतीवाडी! घरी पुरुष कुणी नाही. आईवडील केव्हाच वारलेले. मग शेतीवाडी कुणी सांभाळायची? - बायको, मुलांना त्यानं गावीच ठेवलं! शेतीवाडीसाठी! वर्षातून एक-दोन वेळा तो गावी जाऊन येई! कधी चारपाच वेळा देखील! गावी जाणं त्याच्या मनाचा प्रश्न होता. पैसा हातात भरपूर! पगार व्यवस्थित!

आंघोळ्या वगैरे झाल्यावर दीर अण्णाला हळूच म्हणाला -

"अण्णा!"

"हं! बोल."

"तुमच्या कानावर गोष्टी आल्याच असतील."

"जाऊ दे रे. झालं ते झालं! असं कुणाचं कधी झालंच नाही का गावात! पण ते दडपलं गेलं! हे वर आलं! वर आलं म्हणून त्याचा गाजावाजा!"

"ते झालंच हो अण्णा! वर आलं म्हणून कित्येक गोष्टींचा गाजावाजा होतो. पण वर येत नाही म्हणून माणसानं घाणेरड्या गोष्टी कराव्यात का? मग माणूसपण कसलं एवढं? जनावरंही एवढी घाणेरडी, दुष्ट होत नाहीत! आणि माणसानं... ! सांगा अण्णा!"

"मला कळतं रे... !"

"जीव वेडा झालाय! काय करू, सांग?"

"झाल्या गोष्टी झाल्या! होऊन गेल्या! त्यातून निभावून जायचं! मी हाय ना! मार्ग काढायला! उगाच शोक करीत बसायचं नाही. काही काळजी करू नकोस. मी पाहीन!"

"तुमच्या ओळखीचा कोणी डॉक्टर... तुमच्या ओळखीनं तेवढं करा..."

"काही एक काळजी करू नकोस! एका आठवड्यात आपण करू सर्व काही."

"माझी रजा संपलेय. एकाएकी तार आली. रजा नसताना मी आलो. आजच निघायला हवं. आमचे मिलिटरीचे कायदे सर्व कडक. तसा मी राहू शकतो. एक तार करावी लागेल. पण कारण काय सांगायचं. आई तर नाही! पण 'बाप मेला' असं सांगता यायचं नाही! तो तर आहेच! जगतोय! मुलाचं आजारपण, बायकोचं आजारपण ही कारणं तर सांगूच शकत नाही! अजून माझं लग्नच नाही! आणि आता मला लग्न नकोच! सारा वीट आला!..."

"ठीक आहे. जा तू! मी आहे!"

दिरानं दोनशे रुपये काढले आणि अण्णापुढे धरले. अण्णा ते घ्यायला हात पुढे करणार तोच कमळी तिथं येऊन शांतपणे मान खाली घालून उभी राहिली. अण्णानं तिच्याकडं पाहिलं. त्यानं लागलीच मन बदललं. हात आखडून तो म्हणाला - "काय हे? पैसे? अरे तुझ्यासाठी मी जीव सुद्धा ओवाळून टाकीन माझा. पैशाची काही चिंता करू नकोस. तुला हवे असल्यास माझ्याकडून घेऊन जा. बघ प्रवासात कमी पडतील. घेऊन जा. माझ्याकडे खूप पैसे आहेत! काही एक काळजी करू नकोस! तू माझ्या भावासारखाच ना! जा तू! मी करीन सर्व काही!"

अण्णानं पैसे घेतले नाहीत. उलट तो उठला. कपाट उघडलं. शंभर रुपयांच्या दोन नोटा काढल्या आणि तोंडात जबरदस्तीनं काही कोंबावं तशा त्यानं त्या आपल्या दिराच्या मुठीत कोंबल्या.

संध्याकाळी दीर निघाला.

अण्णानं एक आठवडाभर रजा घेतली. दोन दिवस त्यानं कमळीला टांग्यातून, टॅक्सीतून फिरवलं. हॉटेलात चांगलं चांगलं खाऊ पिऊ घातलं. मुर्गी काय, मटन काय, मासे काय! अगदी आग्रहानं भरभरून खाऊ घातलं! नंतर रस, आईस्क्रीम वगैरे! रस नाना फळांचे! कमळीनं खूप

खाल्लं! खूप रस वगैरे प्यायली! कमळीला हे एक नवलच होतं. गावात श्रीमंत बापाची मुलगी असून हे जीवन अनुभवलं नव्हतं! टांगा, टॅक्सी, सिनेमा, खाणंपिणं! ती खूप सुखावली! अण्णाविषयी तिला आतून खूप काहीतरी वाटलं! कृतज्ञता बुद्धी वगैरे! या बुद्धीतूनच तिनं मनाशी निर्णय केला, अण्णाला कधी विसरायचं नाही!

अण्णा एका मीलमध्ये जॉबर की काहीतरी होता! तो सांगायचा छाती फुगवून, "मी जॉबर आहे!" प्रत्यक्षात काय, कसलं काम करायचा हे त्यानं गाववाल्यांना कधीच कळू दिलं नाही! पगार चांगला होता की वाईट होता हेही तसं कुणा गाववाल्याला त्यानं कळू दिलं नव्हतं. "खूप पगार येतो" येणाऱ्या गाववाल्याला तो सांगायचा. खूप म्हणजे किती हे नेमकेपणानं त्यानं कधी सांगितलं नाही! पण नोकरीबरोबर त्याचा एक छापखानाही होता, माणसं ठेऊन तो तो छापखाना चालवत होता. छापखाना कसा टाकला, तो टाकण्या इतपत त्यानं पैसा कसा आणला हे मात्र कुणालाच माहीत नव्हतं. ते त्यानं कुणालाच कळू दिलं नव्हतं. छापखान्याचंही काम सुरळीत चाललं होतं. पैसा भरपूर येत होता. म्हणजे येत होता तो त्याला भरपूर वाटत होता. गाववाल्यांनाही त्याचा पैसा भरपूर वाटत होता!

दोन दिवसात कमळीला सिनेमा, हॉटेलात खाणे, टांगा-टॅक्सीत फिरवणे त्यानं अगदी मनसोक्त केलं, शुभ्र सदरा, लेहंगा, सदऱ्यावर एक काळं जॅकेट टाकून तो रुबाबदार ऐटीत टांग्यात बसायचा. कमळीला अगोदर प्रेमळपणे बसवूनच! कधी अगदी तिचा पिळदार दंड हलकेच धरूनही!

अण्णा कमळीला आवडला. त्याच्यावर तिचा एकदम विश्वासही बसला. आणि त्याचीही वागणूक किती चांगली! अगदी आपल्या धाकट्या बहिणीला द्यावी तशी!

दोन दिवसात फिरणं, हॉटेलात खाणं, खूप झालं! त्यात खाण्यानंतर तंबाखूचं पान! कमळीनं ही ते खाल्लं! गावातल्या बाप्या, बायकांना तंबाखूचं पान खाण्याची सवय! कमळीनंही तंबाखूची चव घेतलीच होती! तंबाखूच्या पानाचीही! पण मुंबईचं पान काही वेगळंच! आणि त्या तंबाखूच्या पानाला सुगंध वेगळाच! त्या तंबाखूला सुगंध असा काही होता की तो तिला खूप

खूप आवडला. मटणाच्या जेवणानंतर तीच होऊन अण्णाला सुचवायची, "पान खाऊ या ना!" अण्णा खूष व्हायचा, तिच्या नजरेत पाहून!

सुगंधित तंबाखूचं पान खाणं कमळीचं एक आकर्षण झालं!

तिसऱ्या दिवशी अण्णानं कमळीला डॉक्टरकडं नेलं. डॉक्टरचं छोटसंच हॉस्पिटल. त्यानं मोठ्या उत्साहानं अण्णाचं स्वागत केलं. असली गिऱ्हाईकं आली की मोठा आनंद! पैसे चांगलेच उकळता येतात! आणखी काय काय करता येतं! पण अण्णा त्याच्या खास ओळखीचा! तरी त्यानं पाचदहा मिनिटं तपासण्याच्या बहाण्याखाली कमळीच्या अंगावरून उगाच हात फिरवून घेतले! ऑपरेशन अर्ध्या तासाचं! पण डॉक्टरनं दीड तास घेतला.

तीन महिने अंग मेहनतीचं काम करायचं नाही, असा सल्ला देऊन डॉक्टरनं दुसऱ्या दिवशीच कमळीला घरी जाण्याची परवानगी दिली.

अण्णानं खूप विचार केला. त्यानं निर्णय घेतला. एक बाई तीन महिन्यांसाठी घरकामासाठी ठेऊन घेतली. कमळीला चांगलं खाऊ-पिऊ घातलं. अगदी मायेनं! कधी तिच्या गालावरून हात फिरवून तर कधी अगदी कमरेवर हात ठेवून. कसली औषधं कमी केली नाहीत.

दोन महिन्यातच कमळी अगदी ठाकठीक झाली. तिसऱ्या महिन्यात तिनंच मोलकरणीला तिचा तिसऱ्या महिन्याचा पगार देऊन जायला सांगितलं.

ती कामं करू लागली. अंगही चांगलंच भरलं. अण्णानं खाण्यापिण्यात तिला काही कमी केलं नाही.

मग पुन्हा टांग्यातून, टॅक्सीतून फिरणे! रात्रीचे सिनेमे पाहाणे! ते सुद्धा असे तसेच! ज्यात शारीरिक वासना जास्त! मग हॉटेलात खाणे-पिणे! रघूलाही त्यामुळे चांगलं खायला-प्यायला मिळत होतं. तो सहा महिन्यात चांगलाच वाढला, सुधारला!

सहा महिन्यात अण्णानं कमळीला आपलीशी करून टाकली. दर दिवशी येताना रघूला खाऊ! तिला वेणी! किंवा फुलं! दर महिन्याला कमळीला साडी! रघूला कमीज किंवा पॅन्ट! दर दिवशी वेगवेगळ्या भाज्या. रविवारी मटन किंवा मासे. कमळीही अण्णासाठी आपला मोठा भाऊ म्हणून चांगले चांगले पदार्थ करायची. जेवण मन लावून करायची. अण्णाला अगदी

आग्रह करकरून वाढायची. खायला लावायची. पण ह्यामागे तिच्या मनात मात्र काही भलतंसलतं नव्हतं. तसं काही मनात आलं नाही कधी. पण अण्णाच्या मनात मात्र तसं नव्हतं. तिला ज्यानं ज्या दिवशी पाहिलं त्याचवेळी त्याला काहीतरी वाटलं. पण ते वागणुकीत कधी त्यानं दाखवलं नव्हतं. त्याच्या ते मनात यायचं. पण तो मोठ्या कष्टानं तो विचार दाबून टाकायचा! पण आता त्यानं कमळीला आपलीशी करून टाकली होती. कमळीनं त्याच्याप्रमाणे इच्छा कधी व्यक्त केली नाहीच. पण वागण्यातही लवलेश नव्हता त्या भावनेचा. पण आता त्याला खात्री होती की कमळी आपल्याला कधी विरोध करणार नाही.

... आणि त्यानं एक दिवस निश्चय केला. त्याला राहवलं नाही.

**म**ध्यरात्र उलटलेली.

कमळी गाढ झोपलेली. बाजूला रघू. तो बाहेरच्या खोलीत अस्वस्थ. अस्वस्थता अधिकाधिक वाढत गेली. खूप विचार केला. कमळीची ओढ एकदम वाढली. मनाला बांध घालणं अशक्यच झालं. तो उठला, सरळ आतल्या खोलीत आला.

आपण काय करीत आहोत ह्याचं अण्णाला भान राहिलं नाही. मनावरचा ताबा पार उडाला होता.

पुरुषी मनगटाचा विळखा जाणवल्यावर कमळीला जाग आली.

"अण्णा?"

"हो...मीच!"

"हे काय?"

"राहावलं नाही. तुला पाहिलं त्या दिवसापासूनच!..."

"मी तुम्हाला थोरल्या भावासारखं मानत आले..." तिनं अण्णाची मिठी सोडवण्याचा प्रयत्न केला.

''नाही, नाही, कमळे. मी तुला बहिण कधीच मानलं नाही. खरोखर!'' असं म्हणून अण्णानं आपली मिठी अधिक घट्ट केली.

''नाही, नाही! नको, नको, अण्णा! नको ती घाण!''

''कमळे, मी वाईट आहे काय?''

''वाईट नाही... पण...पण...ती घाण नको!''

''कमळे तुझ्यासाठी मी काहीही करीन.''

''काही नको. नको, काही नको. पुन्हा तेच घडणं नको!''

''कमळे, आता असं कधी होणार नाही!''

''कसं होणार नाही?''

''तुला मूल होणार नाही... कधीच होणार नाही!''

''कसं काय?''

''तुझं तसं ऑपरेशनच मी डॉक्टरला करायला सांगितलं होतं!''

''तुम्ही तसं सांगितलं.''

''हो!''

''का तसं सांगितलंत?''

''तसं पुन्हा घडू नये म्हणून! नवरा नसताना बाईस मूल म्हणजे वाईटच नाही का? आता तुला धास्ती नाही. सर्व काही तुझ्यासाठी करीन!''

कमळीला त्याची चीड आली. त्याच्या कमरेत एक लाथ हाणावी, असं तिला वाटलं. पण ते जमलं नाही. तिला खूप वाईट वाटलं. डोळे पाणावले. पण ती रडली नाही. अण्णानं लग्नासाठी मागणी केली असती तर आपण तयार झालो असतो. समाजाचा रीतीरिवाज ठोकरून त्याच्याशी लग्न केलं असतं. पण अण्णाला लग्न नको होतं. अण्णाला आपलं शरीर हवं आहे! तिनं विचार केला. ती निराशली. ती एकदम अबोल झाली. अण्णानं तिला ओढून घेतलं. तिनं काहीच विरोध केला नाही. त्यानं तिचं शरीर ओरबाडलं.

नंतर प्रत्येक रात्री तसं घडत गेलं.

अण्णाला मग तिनं कधी विरोध केलाच नाही.

तिला हवं ते अण्णा देत होता. अण्णाला हवं ते तिला देणं भाग होतं.

त्याला इलाज नव्हता.

तिलाही सवयीनं त्या गोष्टीची चटक लागली! मन निर्ढावलं!

आणि एक भयही अण्णानं नाहीसं करून टाकलं होतं!

तरी एक खंत तिच्या मनात खोल खोल कुठंतरी राहिलीच! - अण्णा आपला नवरा नाही. अण्णा नवरा दुसऱ्याच बाईचा. असा संग म्हणजे वाईटच. आपण म्हणजे त्याची ठेवलेली! रखेली! वेश्याच!... वाईट वाटायचं! ह्या विचारांनी वाटायचं, पळून जावं! पण पळून कुठं जाणार? रघूला कुठं ठेवणार? त्याचं कसं होणार? आणि जायचं तरी कुठं?... मग हे असंच जगणं ठीक! जग म्हणेल ते म्हणो. जगायचं! जगाची पर्वाच नाही करायची. तिनं मनाशी निश्चय केला. आत मनात वाटणारी खंत तिनं खोल कुठंतरी गाडून टाकली आणि रोज अण्णाला सामोरी गेली.

दिवस चालले होते.

**ती**न वर्षे उलटली.

गावाकडच्या गोष्टी कधीतरी कानावर यायच्या.

आईचं पत्र यायचं. खुशाली कळायची. सासरा तीर्थयात्रेला गेला तो आलाच नाही. त्याला महारोग झाला. त्या शोकानं तो परतलाच नाही. मधे धाकट्या दीराचं पत्र आलं. त्यानं त्याच्या लग्नाला आग्रहानं गावी बोलावलं होतं. पण ज्या गावात अब्रूचे धिंडवडे निघाले, त्या गावात पाऊल कसं टाकायचं?- उगीच नकोत ते शब्द कानावर पडायचे. हृदयाच्या चिंधड्या उडायच्या! - कमळी निश्चयानं दीराच्या लग्नाला गेली नाही.

चाळीत बभ्रा झाला.

आपली बायको मधेच गावाहून यायची आणि चाळीत चांगलाच तमाशा व्हायचा, ह्या भीतीनं अण्णानं कमळीला भाड्यानं एक खोली घेऊन दिली.

तिथं तो फक्त रात्री जायचा आणि उजाडता उजाडताच घरी परतायचा.

एक दिवस पहाटेच अण्णाची बायको आपल्या भावाला घेऊन कमळीच्या खोलीवर धडकली.

अण्णाला तिनं बरोबर पकडलं होतं. पण अण्णाची निर्भत्सना करण्याऐवजी तिनं कमळीवरच तोफ डागली -

"रांडे, अवदसे, माझ्या संवसाराची राखरांगोळी करायची हाय काय तुला? यवढी खाज हाय तुला तर बघायचे दुसरे पुरुष उरावर घ्यायला. नायतर व्हायची होतीस वेश्या तिकडं गोलपिठ्याची! वेश्या रांड, माझ्या संवसारात माती कालवायला आलेय. तरी म्हटलं हा नवरा पैसे काय करतो यवढे?..."

अण्णाची बायको खूप काही काही बोलली.

खोलीबाहेर लोकांची गर्दी. कमळीला मेल्यासारखं झालं. तिचं हृदय पिळवटून आलं होतं. ती भेदरलीही होती. अण्णाची बायको एवढी नको ते बोलली, पण कमळीच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाही. अण्णाच्या बायकोच्या शब्दबाणांनी तिचं हृदय, मन विद्ध करून टाकलं होतं.

अण्णानं चूपचाप आपला लेहंगा, सदरा अंगावर चढवला. जॅकेट घातलं आणि तो मान खाली घालून चोरासारखा खोलीबाहेर पडला.

त्याच्यापाठोपाठ त्याची बायको व मेव्हणाही.

हळूहळू खोलीबाहेरची गर्दी, कुजबूज ओसरली. सर्व सामसूम झालं तरी कमळी मान खाली घालून बसली होती. डोक्यात काहूर माजलं होतं.

वेश्या! वेश्या! वेश्या! ते शब्द कमळीच्या डोक्यात निनादत होते. आपण वेश्या! पण आपल्याला वेश्या कुणी केलं? आपण झालो का? जगाचंच हे दडपण! केवळ आपल्या सुंदर देहामुळे! केवळ आपल्या परिस्थितीमुळे! आपण पुरुष असतो तर! पण आपल्याला स्त्रिचं शरीर लाभलं! ते सुंदर! मजबूत! म्हणून त्याच्यावर अत्याचार! बळजबरी!

आणि आपणच दोषी! आपणच वेश्या! तिला खूप खूप काही जाणवलं वाईटही वाटलं. ह्या शरीरातून खरं सुखही नाही मिळालं. झालं ते सर्व मनाविरुद्धच! हवंहवंसं कधी ते वाटलं नाही. जगण्यास दुसरा मार्ग नव्हता आणि आत्महत्या करून जीव देण्याचा विचारही मानवला नाही!

कमळी हळूहळू विचारातून जागी झाली. तिनं मान वर करून पाहिलं. रघू केव्हाच झोपेतून उठून अंथरुणावर बसला होता. तो भेदरलेल्या नजरेनं आईकडं नुसता पाहात होता.

तिनं एकदम त्याला छातीशी घेतलं. त्याला थोपटून कुरवाळून काही एक न बोलता समजावलं.

तिला खूप खूप काही काही वाटलं.

आपला काय दोष? तिनं पुन्हा मनाशीच प्रश्न केले. आपण कुठं म्हटलं होतं अण्णाला, आपल्याकडे ये म्हणून! तोच आपल्या मासाला गोचिडासारखा चिकटला, नको नको म्हणत असताना. त्यानं आपलं सत्व ओरबाडलं, शरीर शोषलं, अगदी जबरदस्तीनं! आणि आपणच वेश्या! हो आपणही झालो! परिस्थितीमुळे! तो अन्न पुरवत होता. कपडे पुरवत होता. आणखी काय नाय! आपण रघूचा विचार केला! तो वाढत होता. त्याला वाढवायचं होतं.

कमळी दिवसभर विचार करायची.

अण्णा महिनाभर आला नाही.

महिना लोटला नाही तो पुन्हा पुन्हा येऊ लागला.

कमळीनं त्याला खूप विनवलं. त्यानं ऐकलं नाही. तिला भीती वाटू लागली. अण्णावर अवलंबून राहाणं चांगलं नाही, हे तिला जाणवलं.

तिनं नोकरीसाठी प्रयत्न सुरू केले. ती खूप भटकली. पण शिक्षण आड यायचं. सातवीनंतर तिचं शिक्षण संपलं. मुलीच्या जातीला एवढं शिक्षण फार झालं, हे तिच्या बापाचं मत. आणि घराण्याच्या, जातीच्या

रीती-रिवाजाप्रमाणे बापाचं ते मत ठाम बरोबर होतं! कमळीला मात्र ते मान्य नव्हतं. तिला शिकावसं वाटत होतं. पण बापापुढं इलाज नव्हता! बाप सांगेल ते ऐकायलाच हवं होतं! ती पुढं शिकली नाही. आणि आता सातवीपर्यंत शिकलेल्या माणसास चांगली नोकरी कशी मिळणार? सातवीपर्यंत शिकलेल्या माणसास चांगली नोकरी मिळण्याचा काळ केव्हाच संपला होता.

अखेर कमळीला म्युनिसिपाल्टीच्या एका दवाखान्यात आयाची नोकरी मिळाली.

रघूही शाळेत जाऊ लागला. ती रघूला बाजूच्या शाळेत पोचवून पुढं कामाला जायची. दुपारी दवाखाना बंद व्हायचा. येताना रघूला घेऊन यायची.

अण्णाचं रात्री नियमीत येणं, सकाळी जाणं, तिची नोकरी, रघूची शाळा, ह्या गोष्टी नित्यक्रमानं चालल्या होत्या.

आई एकदोनदा येऊन गेली.

कमळी कधीच गावी गेली नाही.

दिवस सरकत होते.

महिने सरकत होते.

वर्षे सरकत होती.

रघू वाढत होता. शिकत होता.

सहा वर्षे निघून गेली... विशेष असं काही न घडता.

**ए**क दिवस अण्णाची बायको सकाळीच कमळीच्या दारावर धडकली! सहा वर्षांनी! दर वर्षी अण्णा एक दोनदा तरी गावी जाऊन यायचा. पण ह्या वर्षी मात्र तो जाण्यास विसरला.

ह्यावेळी मात्र तिनं नवऱ्याचीही खरडपट्टी काढली -

"तिला एक शरम नाय! तुमालाही शरम नाय? मुली आता लग्नाच्या झाल्यायत, त्यांचा तरी विचार! ह्या वयात हे चाळे शोभतात तरी काय?

वर्ष झालं. किती पत्रं पाठवलं की, पोरं वाट बघतायत! तरी तुमचा पत्ता नाय. नुसत्या मनीआर्डरसाठी आमी हावोत? ह्याच्यापुढं कधी इथं आलात तर पुन्हा येन गावाहून! आणि वहाणेनं मारीत नेईन इथून! बेशरम कुठले!" असं म्हणून तिनं नवऱ्याची अक्षरशः बखोटी धरली आणि त्याला खेचत नेलं.

त्यानंतर अण्णा तिच्याकडे कधीच आला नाही.

**म**हिना उलटला नाही तो नाम्याशी गाठ! . . . नाम्या ऐन पंचवीशीतला. म्हणजे तिच्यापेक्षा वयानं आठदहा वर्षांनी तरी लहान! किंवा जास्तही! ती पस्तीशीत आली तरी तिच्या शरीरात डौल, चेहऱ्यावरचं तेज तसंच! तारुण्य तसंच होतं! कुणीही पुरुष तिच्याकडं क्षणभर पहायचाच! एवढं ते आकर्षक! नाम्या तिच्यापेक्षा आठदहा वर्षांनी लहान! पण त्यालाही कमळीविषयी काहीतरी वाटलं. पहिल्याच भेटीत! तिलाही काहीतरी तेव्हा वाटलं. पण तिनं लागलीच तेव्हा विचार केला - आता ते पुरे झालं. ह्या शरीरापलिकडे जावं. कुणाही पुरुषाचा संग नको. ती घाण नको. खरोखर घाण. ते काही खरं नव्हे. मनोहर मिळाला असता तर त्याच्याशी संबंध ठेवण्यात काही खरेपणा होता. सुख होतं. आनंद होता. आपला ज्यावर जीव नाही, त्याला शरीर अर्पण करण्यात काय अर्थ? दोन जीवांची एकरूपता हवी. ती झाली होती मनोहरबरोबर! तिला मनोहर आठवला, आणि तिनं मनातच ठरवलं आता कुणाकुणाशीच संबंध ठेवायचा नाही.

नाम्या गोरापान. धडधाकट, उंच! अंगावर नेहमी पांढरा शुभ्र सदरा आणि लेहंगा! त्याच्या लॉन्ड्रीवर कमळी आठवड्यातून एकदा तरी कपडे घेऊन जायची! बोलता बोलता तो गावाकडचाच निघाला. ओळख वाढता वाढता वाढत गेली. तो मग तिच्या कपड्यांचे पैसे घेतच नव्हता. तिच्या साड्या एकदम स्वच्छ, पांढऱ्या शुभ्र करून देई. नंतर नंतर तर तो तिच्या

खोलीवर येऊन स्वतःच बळजबरीनं तिच्या साड्या, पोलकी घेऊन जाई. स्वतःच घरी आणून देई! त्याची खोली होती. पण बायको गावी! शेतीसाठी! जेवणाचे हाल! कमळीला त्यानं पटवलं! मग रात्रीचा एक वेळ तो कमळीकडेच जेवू लागला. एकवेळ जेवणाचे पैसे द्यायचा. ते देखील जास्तच! जबरदस्तीनं, आग्रहानं! चांगलं जेवण मिळतं ह्या नावाखाली! एकट्याला आपल्याला खोलीत झोपवत नाही ह्या सबबीखाली तो नंतर कमळीच्या खोलीबाहेर व्हरांड्यात झोपू लागला! आणि पुढं घडायचं ते घडलं! कमळीनं त्या घडण्याला विरोध केला नाही. तिचं शरीर तिच्या हाताबाहेर गेलं होतं. त्याचं पोतेरं तर केव्हाच झालं होतं! अगदी तिचं लग्न झालं त्या दिवसापासून! नवरा-बायकोतील एकरूपता किंवा स्त्री-पुरुषातील एकरूपता तिनं लग्नानंतर कधीच अनुभवली नाही!

कमळीच्या डोळ्यांसमोरून सारी चित्रं झरझर सरकली आणि तिला तीव्रतेनं खूप खूप काही जाणवलं.

ती आरशासमोर गेली. आरशात पाहिलं.

डोक्यावरचे सारे केस पिकलेले. गालांवर बऱ्याच सुरकुत्या. काय समजायचं ते ती समजली. पुन्हा एकदा ती सारी चित्रं भरभर तिच्या डोळ्यांवरून सरकली. पुन्हा ती भूतकाळात बुडाली.

आतल्या खोलीतून सुनेनं हाक मारली तेव्हा तिची ती चित्रमालिका खर्‌कन तुटली.

''सासूबाय, तुमच्या त्या येड्याला च्या प्यायलातरी बोलवा!''

सुनेनं नवऱ्याला - आपल्या मुलाला - 'येडा' म्हटलेलं कमळीला आवडलं नाही. तिला वाईट वाटलं. नाम्या आतच तिच्याबरोबर लुडबुड करीत होता. चहाबरोबर काहीतरी कुरकुर खात होता. बहुतेक खारी बिस्किटं! तिला एकदम राग आला. आपल्या नवऱ्याला नुसता चहा! नाम्याला चहाबरोबर

बिस्कुटं! किंवा आणखी काही!... तिच्या अंगाचा तिळपापड झाला. पण उघड बोलण्याचीही चोरी! ती तोंडातल्या तोंडात पुटपुटली- "ही अवदसा ह्या घरात आल्याबरोबर हा मेला नाम्या तिला चिकटला. आपल्याकडं आता बघतसुद्धा नाही! आपण आता म्हातारी झालो!... बायकोला तिकडं कायमची गावी ठेवलीन्! ती काय करीत असेल?... की तीसुद्धा...??"

कमळी व्हरांड्यात आली.

रघू पिंपळाच्या पारावर खाली बसला होता. तिनं दुसऱ्या माळ्यावरून हृदय पिळवटून हाका मारल्या -

"रघू, रघू, रघू!!!"

रघूनं हरवलेल्या नजरेनं तिच्याकडं पाहिलं. कमळीनं हातवारे करूनच त्याला खुणेनं चहाला बोलावलं.

काही वेळ तो नुसताच पहात होता.

ती हातवारे करून त्याला जिवाच्या आकांताने खुणावत होती.

शेवटी त्याच्या डोक्यात प्रकाश पडला तेव्हा त्यानं अगदी वैतागल्यागत उबगून जलद गतीनं हातवारे करून चहाला निश्चयपूर्वक नकार दिला.

ती हताशपणे त्याच्याकडे पहात राहिली.

त्यानं आपली दृष्टी पुन्हा आकाशाकडे लावली.

आपल्या मुलाच्या ह्या अवस्थेला आपण कारणीभूत आहोत, आपल्या लग्नाअगोदरच आपण आपला जीव देऊन मोकळे झालो असतो तर हे सारं टळलं असतं! - तिला तीव्रतेनं वाटलं.

निश्वास टाकून ती घरात आली.

रघू तसाच पारावर बसून आहे. त्याची हाता-पायांची नखं वाढली आहेत. दाढी, केस वाढलेयत. महिन्याने, दोन महिन्यांनी, कधीतरी आई न्हाव्याला बोलावते. तेव्हाच केस कापले जातात. दाढी काढली जाते. नाहीतर केस आपले वाढतात. दाढी वाढते. रघूला केस किती वाढतात, दाढी किती वाढते, आपण कसे दिसत असू ह्याची काहीही फिकीर नसते. खरं म्हणजे ह्या गोष्टीचं त्याला भानच राहिलेलं नाही. भान कधी नसतंच! अशी मनाची अवस्था! अंगावरचे कपडे मळलेत! कधी धुतले जातील तेव्हाच ते स्वच्छ! कधी कोणी धुतलेले स्वच्छ कपडे त्याला घालायला सांगेल, तेव्हाच त्याच्या अंगावर स्वच्छ कपडे!

लोक आता त्याला वेडा समजतात. लोकांना तसा तो वाटतो. पण आतून तो वेडा झालेला नाहीच. सारखे विचार डोक्यात! सारखे विचार मनावरून!

त्याला सर्व काही कळतं. पण कळून काही एक उपयोग नाही. कळून आपण काही करावं असं आपल्या हातात नाही. आणि काही भलतंसलतं करण्यातही अर्थ नाही, हे खोल मनात कुठंतरी पटलेलं!

आपलंच काहीतरी चुकलेलं! कुणीतरी चुकवलेलं! हे त्याला जाणवलेलं! क्रूर होणं त्याच्या स्वभावात नाही. पण सहन तरी किती करायचं? - तो भयंकर अस्वस्थ झाला.

बायकोनं, नाम्यानं आपण वेडे म्हणून चांगलाच प्रचार केलाय. लोकही आपल्याला वेडा समजतात. त्यानं मनातच म्हटलं आणि तो स्वतःशीच हसला. आपण वेडे नाही. आपल्याला चांगलं कळतं. आणि खूप कळतं! पण खरोखर आपण वेडंच व्हायला हवं होतं. म्हणजे ह्या वेदना तरी

संपल्या असत्या, काय काय घडतं त्याचं काही एक वाटलं नसतं!... त्यानं विचार केला.

आपली मुलं वाढताहेत. मोठी मुलगी लग्नाला आलेय. दोन मुलगे, दोन मुली आपल्या! आपल्या नावावर! चार मुलं आपल्या नावावर! जगाच्या दृष्टीनं ती आपली! आपण त्यांचे जन्मदाता! बाकी जन्मदाता नाम्याच! मुलं खरी नाम्याचीच! तोच खरा पोरांचा बाप! पण बिचारी पोरं आपल्यालाच बाप समजतात! त्या पोरांचा तरी त्यात काय दोष? काही लोकांना हे माहीत आहे! नाम्याच त्यांचा बाप! पण हे आपल्या पोरांना जेव्हा कळेल तेव्हा त्यांना काय वाटेल? चांगलं वाटेल का? बिचारी मुलं! आपल्यालाच त्यांचा बाप समजतात! कारण त्यांच्या आईचा लग्नाचा नवरा मीच ना! मग त्यांचा बाप मीच! समजू देत! समजू देत! पण मी त्यांचा बाप नव्हे! अगदी पहिल्याच दिवसापासून! पहिल्याच दिवशी बायकोची किळस आली. तेव्हाच समजलो. आपण फसलो होतो. आपलं लग्न हे लग्न नव्हतं. नंतर बायकोला आपण स्पर्शही केला नाही. तिच्याविषयी काही वाटलंच नाही. तिलाही आपल्याविषयी ओढ नव्हती. आपण स्पर्शही केला नाही, तरी तिला मुलं होत होती.

थोरली लग्नाला झालेय. तिचं लग्न व्हायला हवं होतं. दुसरीसुद्धा लग्नाला होईल. तिचंही व्हायला हवं. मुलांची लग्नं व्हायला हवीत. पण ही लग्नं कशाला? हे जन्म कशाला? हे असले जन्म? हे माणसाचे जन्म का? आणि त्यासाठी ती विधीपूर्वक लग्ने तरी कशाला? काय ते भट! काय ते विधी! काय तो खर्च! काय ती जेवणं! काय ते सनई नि चौघडे! किती तो पवित्र देखावा! आणि हे सर्व घाणेरडंपण! सर्व घाण! आपल्या लग्नाचा केव्हढा थाट आणि देखावा झाला! आणि पहिल्या रात्रीच सर्व घाण अनुभवास आली... आपल्या मुलांची अशी लग्न नकोत! तो देखावा नको! आणि पावित्र्याचा देखावा करून नंतर पदरात घाण पाडण्याचा अनुभव तर मुलांना नकोच! पण आपली मुलं कसली! ती तर नाम्याचीच! नाम्या करील त्यांची लग्ने! केव्हढा जिवाचा आटापिटा करून नाम्यानं पळून गेलेल्या थोरलीला घरात आणलं! थोरली पळून गेली तर काय

झालं? पण भडव्या नाम्याची जात बुडत होती! ह्रा जे काही करतोय ते चांगलं! दुसऱ्याच्या बायकोला आपल्या बायकोसारखी वापरतोय! एवढं होतं तर आपल्या बायकोशी ह्यानंच लग्न करायचं होतं! मला कशाला फसवायचं? माझा कशाला बळी द्यायचा?...

रघूचं डोकं घिरटलं. साऱ्या घटना एकेक त्याच्या डोळ्यांसमोर झरझर सरकू लागल्या.

रघूला गावातलं काहीच आठवायचं नाही. तेव्हा त्याचं वय दोनतीन वर्षांचं! त्या वयातलं कसं काय आठवणार? मात्र तो शाळेत जावयास लागला ते दिवस आठवायचे. सहावीपर्यंतचे दिवस आठवायचे. त्यावेळी अण्णा आपला कोण, काय वगैरे विचार त्याच्या मनात आले नाहीत. अण्णा बापासारखं आपलं सारं काही करतो ह्या विषयीही त्यावेळी त्याला काही वाटलं नाही. अण्णा संध्याकाळी खाऊ आणायचा. आवडीने त्याला कपडे शिवायचा. टांग्यातून फिरवायचा. हॉटेलात खाऊ घालायचा. सिनेमा दाखवायचा. आईपेक्षा अण्णा त्याचे लाड पुरवायचा. अण्णा त्याला खूप आवडायचा. अण्णा त्याला खूप आवडायचा, पण अण्णा आईचा कोण होता, त्याचा कोण होता, हे मात्र त्याला काही कळत नव्हतं. अण्णा आपला बाप नव्हता हे मात्र त्याला कळू लागलं होतं. कारण बापाला इतर मुलं 'बाबा' हाक मारतात हे त्याला माहीत होतं. पण अण्णाला तो 'मामा' म्हणून हाक मारायचा! आईनेच तशी हाक मारायाला शिकवलं होतं. मामा म्हणजे आईचा भाऊ! हे त्याला नंतर चांगलं कळू लागलं होतं. आणि त्यामुळे अण्णा म्हणजे आईचा भाऊच, अशी त्याची कित्येक दिवस कल्पना होती.

पण एक दिवस त्यानं विचित्रच पाहिलं.

तो नुकताच सातवीत गेला होता. रात्री तो लघवीला उठला. दिव्याचं बटन दाबलं. प्रकाश पडला. त्याला जे काही दिसलं त्याची त्यानं कल्पनाही

केली नव्हती. एवढं वेगळं! एवढं विचित्र! आई आणि अण्णा एकमेकांच्या कुशीत गाढ झोपलेली! दोन्ही उघडीवाघडी, वस्त्रहीन! हे काय? त्याच्या बालमनात खूप प्रश्न आले. त्याच्या मनाला ते पटलं नाही. निदान ते पाहणं असह्य झालं मन काळवंडलं. मन अस्वस्थ झालं. काहीतरीच वाटलं. वाईटही वाटलं. त्यानं पोटातली कळ दाबली आणि त्यानं लागलीच दिवा मालवला. तो आवाज न करता अंथरुणावर पडला.

पहाटेपर्यंत त्याचा डोळा लागला नाही.

डोळ्यातून पाणी झिरपत होतं.

काहीतरी वाटत होतं. का वाटत होतं, ते कळत नव्हतं.

काहीच कळत नव्हतं. कळेनासं झालं होतं.

सकाळची सातची शाळा. तो उठलाच नाही.

आई उठवून थकली.

"रघू, काय रे! काय होतंय रे तुला. आज उठत का नाही?"

ह्याच्यावर त्याच्याकडं काय उत्तर होतं?

तो आकाशाकडं नजर हरवून फक्त पहात होता.

आईनं हेकाच धरला तेव्हा तो म्हणाला -

"बरं नाही वाटत!"

"काय दुखतंय काय?"

"तसं काही दुखत नाही. पण बरं नाही वाटत. शाळेत जाण्याची इच्छा नाही!"

"अरे! मास्तर काय म्हणतील? एवढा हुशार मुलगा! कधी शाळेत गैरहजर नाही. आणि आज गेला नाहीस तर! दिवस बुडेल ना! आणि आजचा अभ्यास? तो बुडाला की तुझा पहिला नंबरही जायचा!!..."

"आई!.. जाऊ दे! पहिला नंबर मला नकोय... मला खरोखर जावंसं वाटत नाही शाळेत!"

"म्हणजे?"

"मला बरं वाटत नाही!" तो काहीसा त्रासिकपणे म्हणाला.

आई कामावर गेली.

तो दिवसभर नुसता त्याच गोष्टीचा विचार करीत होता. जे चित्र दिसलं त्यावर! त्याचा अर्थ काय?... सारखा तोच विचार! सारखं तेच चित्र डोळ्यांसमोर दिवसभर! दिवसभर तो घरी जेवण असूनही जेवला नाही. खाण्यावर वासनाच झाली नाही.

आई कामावरून आली. थोडी उशीराच. चार वाजता. मुलानं जेवण घेतलं नाही हे पाहून तिचा जीव गलबलला, शेवटी तो पोटचा गोळाच! तिनं खूप आग्रह केला. एकदोन घासच त्यानं खाल्ले. नंतर त्याने ताट लोटूनच दिलं.

कमळीला काही कळेनासं झालं.

त्याने जे काही पाहिलं त्याची तिला कल्पना नव्हती. त्याच्या वेदना तो शब्दात सांगू शकत नव्हता. त्याच्याकडे शब्द नव्हते आणि शब्द असते तरी तो सांगूही शकत नव्हता.

संध्याकाळी अण्णानं खाऊ आणला. रघूनं त्याला स्पर्शही केला नाही.

एकदम अण्णाची घृणा वाटली. पण तो काहीच बोलू शकला नाही. त्याला कसं सांगायचं? आईला कसं सांगायचं? कुणाला कसं सांगायचं? काय सांगायचं?

अण्णा त्याला विचारत होता, "काय झालं बाळा रघू आज? काय झालं? काय झालं?"

अण्णा मोठ्या लाडानं त्याला विचारत होता.

रघूला काही एक सांगता आलं नाही. काही एक बोलता आलं नाही.

रघू काही दिवस शाळेला गेलाच नाही. शाळेला, कुठेच जाऊ नयेसं त्याला वाटत होतं. एवढं त्याच्या मनाला काहीतरी झालं होतं. त्याला काहीच बोलता येत नव्हतं!

आईनं आग्रह केला, जबरदस्तीच केली तेव्हा तो शाळेला जाऊ लागला.

पण वर्गात त्याचं लक्षच नसायचं. त्याचं लक्ष उडालेलं. मन हरवलेलं!

शाळेत जाताना तेच चित्र आठवायचं! मास्तर शिकवताना तेच आठवायचं. मास्तरांनी शिकवलेले डोक्यात जायचं नाही. तो अभ्यास करायचा. पण अभ्यास करताना परत तेच आठवायचं. पुस्तक नुसतं पुढ्यात. अक्षरं फक्त डोळ्यांसमोर! डोक्यात अर्थ शिरतच नव्हता.

अण्णा आपला बाप नाही. आणि बाप असता तरी ते चित्र सहन न होण्यासारखं! मग अण्णा तर बापच नव्हता.

त्या बालमनालाही भयंकर काही जाणवलं होतं.

त्याला काही एक बोलता येत नव्हतं.

तो काही एक कुणालाही बोलला नाही. त्यानं ते मनातच ठेवलं.

पाचसहा महिन्यांनी रघूला आणखी एक धक्का बसला.

अण्णाची बायको सकाळीच दारावर!

दारावर जोरदार थापा! अण्णा, आई उठली. त्यांच्या मागोमाग तोही. अण्णाच्या बायकोची शिव्यांची लाखोली!

तो तिरमिरला.

सकाळी सकाळी दारावर लोकांची गर्दी.

त्याच्या जिवास कुठंतरी लागलं.

अण्णा गेला.

आईनं रघूकडं हताशपणे पाहिलं. त्याला तिचा रागही आला होता. पण तो तिला काही एक बोलू शकला नाही.

काहीतरी खोलखोल त्याला जाणवलं. हृदयाला काहीतरी टोचलं. एक वेदना! ती वेदना कायमच राहिली. डोकं नेहमी भिरभिरतच राहिलं. चित्त उडालं. मन कशातच रमेना. जीव कशात लागेना. शाळेत जायचा. पण मास्तरांच्या शिकवण्यात त्याचं मन स्थिर होत नसे. अभ्यासात तो मागे मागे येऊ लागला.

सहा महिन्यांनी नाम्या घरात शिरला.

आई पस्तिशीच्या पुढं, नाम्यानं फार तर पंचवीशी ओलांडलेली. नाम्या आणि आई ह्यांच्यात तसले संबंध असतील असं त्याच्या स्वप्नातही कधी आलं नाही.

नाम्या प्रथम खाणावळी म्हणून आला. रात्रीचा जेवायचा आणि लागलीच जायचा.

नंतर नंतर तो रात्रीच्या जेवणानंतर व्हरांड्यात झोपू लागला. घरात हवं, नको ते पाहू लागला. आईला पैसे देऊ लागला. त्याची लॉन्ड्री! त्याची पॅन्ट, लेहंगा, शर्ट, सदरा सदैव स्वच्छ शुभ्र! नेहमी पांढरे कपडे! कडक इस्त्रीचे! रघूचेही सारे कपडे लॉन्ड्रीतून यायचे. स्वतः नाम्या ते न्यायचा आणि आणायचा.

दोन वर्षे गेली.

एका रात्री रघूला अचानक जाग आली. खोलीत अंधार होता. तरी आईच्या बाजूला कोणीतरी झोपलंय, हे त्याला जाणवलं. त्यानं डोळे चोळले. डोळे फाडून पाहिलं. माणसाची स्पष्ट आकृती त्याला दिसली. पण कोण, हे ओळखता येत नव्हतं. कोण म्हणून त्या आकृतीला तो हटकूही शकला नाही. एवढ्या रात्री कोण येणार? नाम्या असावा का? मग त्याच्याशिवाय कोण? त्याने विचार केला. त्याला असह्य झालं. त्यानं आईला हाक मारली. त्याबरोबर ती व्यक्ती काळोखातून विजेसारखी सणकन् पळून गेली. रघू उठला. तो दरवाज्यातून बाहेर आला. त्यानं नाम्याच्या अंथरुणाकडे नीट लक्ष देऊन पाहिलं. नाम्या डोक्यावर चादर घेऊन मोठमोठ्यानं घोरत होता.

रघूला आश्चर्य वाटलं.

नाम्याशिवाय मग दुसरं कोण? - रात्रभर तो विचार करीत होता. डोळा लागलाच नाही. तो तळमळत होता. काय करावं सुचत नव्हतं.

उजाडता उजाडता तो कंटाळून उठला. दिव्याचं बटन दाबलं. झक्कन प्रकाश पडला. आई अद्याप गाढ झोपली होती. तिचे कपडे अस्ताव्यस्त. तो तिच्याकडे निरखून पहात होता. तिच्या बाजूला निळ्या रंगाचं बनियन पाहून त्याला धक्काच बसला. ते बनियन नाम्याचं होतं.

मन झाकोळून आलं.

डोकं घिरटलं. अभ्यास झाला नाही.

त्या दिवशी शाळेला तो गेलाच नाही. दिवसभर तो अंथरुणावर पडून किंवा खुर्चीत बसून होता.

दुसऱ्या दिवशी तो रात्री झोपला नाही. झोपेचं ढोंग घेऊन तो चादर डोक्यावर घेऊन पडून राहिला. आईनं दिवा मालवला. बराच वेळ होऊन गेला. मध्यरात्र उलटलेली होती. सारं सामसूम होतं. सारी चाळ शांत होती. दाराचा आवाज कानावर पडला. रघूनं हळूच चादर वर केली. नंतर दाराची कडी लागली. त्याला पुरुषाची आकृती स्पष्ट दिसली. तो नाम्याच होता. रघू चादरीतून नाम्याकडे पहात होता. नाम्या हळूच आईच्या बाजूला घुसला. आईनंही त्याला जवळ घेतलं.

पुढचं पहाणं त्याला असह्य झालं.

उठून एक धोंड त्या दोघांच्या डोक्यावर घालाविशी वाटली. पण तो तसाच गुदमरल्यागत पडून राहिला.

त्या दोघांचं ते नित्याचंच झालं.

रघूचंही पहाणं नित्याचं. असह्य व्हायचं. पण सहन करण्यावाचून दुसरा कसला मार्ग होता? कुठं जायचं? कुठं जाणंही शक्य नव्हतं.

आईला सांगणही शक्य झालं नाही. काय सांगायचं? कसं सांगायचं?

तो नुसता विचार करायचा! विचार करून करून त्याचं डोकं फिरायचं. डोक्यात गोंधळ व्हायचा. राग यायचा. पण आईवर रागवणं जमलं नाही. नाम्याविषयी तो मनात धुसमसायचा. पण उघड उघड तो नाम्यावर कधी रागावला नाही. आतल्या आत सर्व!

त्याची झोप उडाली.

मग रात्रभर तळमळणं. विचार करणं. तोंडातून कधी एक शब्द नाही.

नंतर नंतर रघू अबोल झाला. बोलणं संपलंच त्याचं. आपल्या वयाच्या मुलांपासूनही तो दूर राहू लागला. एकटाच आपल्या विचारात बुडून जायचा. नाम्याशी एक शब्दही बोलायचा नाही. त्याच्याकडे पहायचाही नाही. नाम्याविषयी मनात घृणाच! पण तीही उघड उघड नाही. आईशी फक्त 'होय', 'नाही' एवढयापुरतं बोलणं राहिलं. तिच्याकडे काही मागणं, तिला काही सांगणं संपलं. ती देईल, ते घ्यायचं. ती वाढेल, ते खायचं आणि शांतपणे, मुकपणे ताटावरून उठायचं! आईनं काही सांगितलं तर नुसता तिच्याकडं पाहायचा. तिने सांगितलेलं काम मूकपणे करायचा. दूध आण म्हटलं की, दूध आणून द्यायचा. रेशन आण, आणून द्यायचा. तेल आण, आणून द्यायचा. तोंडातून एक चकार शब्द नाही. रघू अगदी मुका झाला. लोक म्हणू लागले, रघू वेडा झाला. कुणी गंमतीने म्हणायचे, त्याच्या डोक्यातला एक आटा ढिला झालाय! त्याला त्याचं एवढं काही वाटायचं नाही. लोकांची टिंगल आणखी कितीतरी त्याने पचवली असती. त्याचं दुःख त्याला वाटलं नसतं. पण त्याचं जे दुःख होतं ते त्याच्या मनाला पेलवणारं नव्हतं. त्यानं ते मनात खोल लपवून ठेवलं होतं. पण ते सदोदित सलायचं. त्याला त्रास व्हायचा.

रघू आपल्याशी बोलत नाही, सदैव अवाक, मुका हे कमळीला प्रकर्षानं जाणवायचं. तिचा जीव गलबलून यायचा. पण तिच्याही हातात आता काही उरलं नव्हतं. ती वाहत होती. ते वाहणं थोपवणं तिच्या हातात राहिलं नव्हतं.

रघू अभ्यासात हुषार! पण दरवर्षी तो अभ्यासात मागे मागे येऊ लागला. दहावी कसाबसा तो पास झाला. पास झाला म्हणजे शिक्षकांच्या अनुकंपेने तो अकरावीच्या वर्गात ढकलला गेला! एक गरीब पोर, कधी त्रास दिला नाही. एकाएकी ते बथ्थड झालं, म्हणून शिक्षकांच्या मनात

त्याच्याविषयी अनुकंपा! अकरावीची परीक्षा बोर्डाची! पण रघूला अगदी हेडमास्तरांसहीत सर्वांनी अकरावीत ढकलून दिलं! त्याचा पूर्वीचा अभ्यास पाहून! त्याची गरीबासारखी वागणूक पाहून! सर्व शिक्षकांना तो हात जोडायचा! अगदी नम्रतेनं! शिपायालाही हात जोडायचा! म्हणजे शिपायापासून ते हेडमास्तरांपर्यंत त्याच्याविषयी सर्वांच्या मनात कणव!... पण तो असा का झाला हे मात्र कुणाला कळलं नाही. रघूनं आपलं मन कुणाशीही खुलं केलं नाही.

रघू अकरावीत गेला. न मागता सर्व पुस्तकं, वह्या, पेन त्याला मिळाली. सर्व नाम्यानं आणली!

रघू अभ्यास करण्याचा खूप प्रयत्न करायचा.

पण सर्व बिघडायचं!

सारखी तीच तीच अण्णाची, नाम्याची चित्रं डोळ्यासमोर यायची. पुस्तकातील अक्षरंच उडून जायची.

अक्षरांमधला, शब्दामधला अर्थ डोक्यात झिरपतच नव्हता!

रघू सारं मन एकवटून मोठ्या कष्टानं ते अभ्यासात गुंतवायचा. 'मॅट्रिक होऊन ह्या घरातून निघून जायचं कुठंतरी, नको हे, नको हे!' असं मनाशी ठरवून तो अभ्यासात मन गुंतवायचा! पण मन कुठं त्याच्या ताब्यात होतं? ते अभ्यासावरून उडून पुन्हा त्याच चित्रांवर बसायचं.

पहिल्यांदा बसला.

दुसऱ्यांदा बसला.

तिसऱ्यांदाही बसला.

सर्व वेळा त्याच्या दांड्या उडाल्या! तो नापास झाला! लोकांमध्ये हसं! पण ह्या असल्या नापास होण्याचं त्याला दुःख नव्हतं!

मॅट्रिक पास होणं कठीण होतं! कठीण नसतानाही! प्रत्येक वेळी मराठीत आणि इतिहासात त्याला चांगले गुण मिळाले!

मुख्यतः इतिहासात! इतिहास त्याच्या आवडीचा विषय! शिवाजी महाराजांचा इतिहास त्याला खूप खूप आवडायचा! विशेषतः शिवाजी महाराजांनी आठ बायका केल्या हा इतिहास! हा इतिहास खरा की खोटा?

तो कसाही असो! पण त्याला तो आवडायचा. शिवाजी महाराजांनी आठ बायका केल्या हे त्याला आवडलं. ज्या स्त्रीशी संबंध ठेवायचा तिला प्रथम बायको करून घ्यायचं, म्हणजेच तिच्याशी लग्न करायचं, कायदेशीर बायको करायचं, नंतर संबंध! हे चांगलं! म्हणजे त्यातून होणाऱ्या मुलांचे वांदे नाहीत! नाहीतर अशा कुणापासूनही होणाऱ्या मुलांचे किती वांदे!!! आणि ते लग्न न करता हजार स्त्रियांशी संबंध किंवा हजार पुरुषांशी संबंध! त्यातून आणखी काय काय? त्यापेक्षा हे शिवाजी महाराजांचं बायांशी सरळ लग्न लावणं चांगलं! - शिवाजी महाराजांचा हा इतिहास त्याला एकदम आवडला. शिवाजी महाराज त्याला इतर कारणांसाठीही आवडत. त्यांचं ते लढणं! त्याला वाटायचं, आपणही घोड्यावर बसून तलवार परजत लढावं. पण आता तर बंदुकांचा काळ! कुठूनही गोळी येते. तोफा डागल्या जातात. कुठून भसकन् विमान येतं आणि बॉम्ब टाकले जातात. कुणालाही मारलं जातं. कधीही! कुठेही! हे काय खरं नव्हं ही काय लढाई नव्हे. शिवाजी महाराजांची खरी लढाई. आमनेसामने! दोघादोघांत! अशी शिवाजी महाराजांसारखी तलवार घेऊन लढाई करायला आपल्याला आवडलं असतं. सहज लढलो असतो. अगदी सहज! पण ही मॅट्रीकची परीक्षा नको. ती पास होणं कठीण कठीण!... तो विचार करायचा. कशाला ही परीक्षा? आणि इंग्रजी व गणित ह्यांची सक्ती कशाला? इंग्रज तर आता गेले! शूर वीरांना ह्या इंग्रजीच्या आणि गणिताच्या परीक्षेला बसवलं असतं तर ते तरी पास झाले असते का? तिसऱ्यांदा गणितात व इंग्रजीमध्ये त्याचा धुव्वा उडाला तेव्हा तो आपल्या मनाशी म्हणाला आणि असल्या परीक्षेच्या वाटेस जायचं नाही असा त्यानं मनाशी निश्चय केला.

नाम्यानं इन्कमटॅक्समध्ये शिपायाची नोकरी आणली ती त्यानं निमूटपणे स्वीकारली.

शेवटी नाम्यानंच नोकरी आणावी? आणि आपण ती स्वीकारावी? त्याला फार टोचलं! पण इलाज नव्हता. नोकरी करायलाच हवी होती. पण नाम्यानं आपलं मिंधेपण वाढवलं, हे त्याला आवडलं नाही.

शिपायाची नोकरी त्याला आवडली नव्हती. पण साधं मॅट्रिक होता येत

नाही, मग चांगल्या नोकरीची कशी अपेक्षा करायची? त्यानं विचार केला. तलवार परजणारा शिपाई नाही तर नाही, पण ऑफिसातील ग्लासं, फायली उचलणारा शिपाई तर झालो! त्यानं स्वतःचं समाधान करून घेतलं आणि तो नित्यनेमानं कामावर जाऊ लागला.

एक वर्ष झालं. नोकरीत जवळजवळ तो कायम झाला.

आणि एक दिवस नाम्यानं कमळीकडं रघूच्या लग्नाची गोष्ट काढली. नाम्यानंच मुलगी आणली होती. मुलीला न पहाताच कमळीला ती एकदम पसंत पडली. आईला पसंत मग रघूलाही पसंत! मुलगी पहाण्याचा मग प्रश्नच नव्हता!

तरी मुलगी पहाण्याचं रीतीरिवाजाप्रमाणे झालं कारण इतर सर्व काही गोष्टींपेक्षा ते फारच महत्वाचं!

सर्व गोष्टी नाम्याच्या पुढाकारानं होत होत्या.

घाईघाईत साखरपुडा झाला. लग्नही घाईघाईत.

नाम्यानंच बहुतेक गोष्टी ठरवल्या. हॉल, बँड नाम्यानंच ठरवलं. मुलीच्या अंगावरच्या मंगळसूत्राचे पैसे नाम्यानेच दिले.

रघूला लोक जेवढा वेडा समजत होते तेवढा तो वेडा नव्हताच. खरं म्हणजे वेडा नव्हताच. त्याला सारं काही कळायचं. तो आतल्या आत खूप विचार करायचा. पण तोंडावाटे काहीच नाही. फक्त नेमकं बोलणं. बाहेरून दिसायला तो वेडा, भोळा, भोळसट वगैरे होता. म्हणजे लोकांचीच नव्हे तर आई, नाम्यापासून सर्वांची त्याच्याविषयीची ती कल्पना होती.

पहिल्या रात्रीतच त्याला बायकोचं चारित्र्य समजलं. तिने लग्नापूर्वीच लग्नानंतर घ्यावयाचे अनुभव भरपूर घेतले होते, हे त्याला लागलीच जाणवलं. त्याला एक घृणा वाटली. घाण वाटली. वाईट वाटलं. डोक्यावर आघात झाल्यासारखा वाटला. डोकं घिरटलं. मन पिळवटून आलं. एक भयंकर चीड आली. बायकोला चाबकानं फोडावसं वाटलं. तसं होतं तर निदान बायकोनं लग्नाअगोदर आपल्याला सांगायला हवं होतं. निदान त्या रात्रीतरी. त्याचं डोकं खूप भिरभिरलं. बायकोला लाथ मारून घराबाहेर काढावं, असं त्याला वाटलं. पण त्याच्या हातून काही एक झालं नाही. त्याच्या तोंडून एक शब्ददेखील बाहेर पडला नाही. सारी वेदना, सारे ठणके त्यानं हृदयात दाबून टाकले आणि बायकोकडं पाठ फिरवून दुसऱ्या कुशीवर बायकोपासून काहीसा दूर पहुडला.

उजाडेपर्यंत डोळा लागला नाही.

नुसते विचार, विचार, विचार. बायकोचं कौमार्य नष्ट झालेलं त्याला जाणवलंच. पण त्याला आणखी काहीतरी जाणवलं. त्याला संशय आला. काहीतरी बायकोच्या पोटातही गडबड असावी, असं त्याला वाटलं. आपली फसवणूक झाली. बायको आपल्या गळ्यात मारली गेली आहे. दुसऱ्याचं कर्म आपल्या माथी! आपण एक गरीब म्हणून, आपण एक साधेसुधे म्हणून! त्यानं खूप विचार केला. त्याचं मन तळमळलं, उदासलं.

तो बायकोला काही एक बोलला नाही. एकदम संशय व्यक्त करणंही बरं नाही, त्याला वाटलं. काही दिवस वाट पाहिली पाहिजे. एक महिनातरी! तो मनाशीच म्हणाला आणि अखेर फटफटीत उजाडलं तेव्हा तो अंथरुणातून उठला. बायको त्याच्या अगोदरच उठून साध्वी स्त्रीप्रमाणे घरकामाला लागली होती. त्यानेही आपले सारे विधी एकामागून एक उरकून घेतले.

तो आंघोळी करून मोरीतून बाहेर पडला तेव्हा बायको देवापुढं निरांजन लावून हात जोडत होती. तिच्याकडे त्यानं तिरस्कारानं पाहिलं. तिनं मोठ्या भक्तिभावपूर्णतेनं देवाला हात जोडले होते.

त्याला मोठ्यानं हसावसं वाटलं.

तो हसला नाही.

कामावर जाताना आईनं समोर येऊन त्याच्याकडं पाहिलं. आईच्या दोनचार थोबाडात द्याव्यात, असं त्याला वाटलं. त्यानं मान खाली घातली आणि पंख गळलेल्या पाखरागत तो निघून गेला. काहीएक न बोलता! आईबापांवर हात उगारू नये! पण आईबाप क्रूर श्वापदं असतील, गिधाडं असतील, डुक्करासारखी घाणीतच लडबडत असतील तर? तर त्यांना जरूर मारावं!... आईच्या एक थोबाडीत द्यायला हवीच होती. जिन्यावरच्या पायऱ्या उतरता उतरता त्याच्या मनात विचार आले. तरी तो जिना उतरून सरळ चालता झाला. त्यानं मागे पाहिलं नाही.

एक महिन्यात त्यानं खूप अनुभवलं.

बायको म्हणून तो बायकोजवळ झोपायचा. निरिच्छेनं सर्व काही व्हायचं. मनाला कुठं कुठं खुपायचं.

एका महिन्यात सिनेमे किती झाले. तेसुद्धा चावट. चावट विनोदांवर तिचं ते फिदीफिदी हसणं! त्याला किळस यायची. आणि तिचं ते सिनेमाचं वेड भयंकरच! सिनेमाच्या नट्यांचं सारं अनुकरण! केसांना फुगे काढणे! कानावर केसांचे वेटोळे ठेवणे! साडी बेंबीच्या खाली नेसणे! डोळे उगाच तिरकस करून पाहाणे! अगदी काहीतरीच! आणि कसले ते सिनेमे! आणि काय तिची आवड! सिनेमाची तिकिटं अगोदरच काढलेली असायची. त्याला जावं लागायचं. ती चला म्हटली की तो निघायचा कारण तिकिटं काढलेली असायची! तीसुद्धा नाम्यानं! खरं म्हणजे ते चावट सिनेमे पहाण्याची नाम्याचीच आवड! बरं त्याची आवड! पण नेहमी तो तीनच तिकिटं काढायचा! नेहमी तो सिनेमाला असायचाच! प्रत्येक वेळी त्याची काय जरूर होती? रघू मनातून चरफडायचा. पण त्याला नाम्याला स्पष्टपणे सांगता आलं नाही. नाम्या रघूच्या बायकोजवळच तिच्या खांद्याला घासून बसायचा. सिनेमात ती दोघं खूप खिदळायची. रघूचं सिनेमावर लक्षच नसायचं. फिरायला दोघं नवराबायको निघाली तरी नाम्या-बरोबर. बायको नाम्याबरोबर चालायची. रघू नेहमी मागे. बसमध्ये बसताना नाम्याच बायकोच्या बाजूला! रघूला काहीतरी जाणवायचं. संशय वाटायचा. पण संशय बोलून दाखवणं त्याला जमलं नाही. कारण रघूची बायको नाम्याच्या जवळच्या

नात्यातली! मग नाम्याचा तसला संबंध कसा असेल? रघू विचार करायचा.

असा एक महिना उलटला.

आणि त्याची खात्री झाली. त्याला शिसारी आली. एकदम घाण वाटली.

त्या दिवसापासून त्यानं बायकोच्या शेजारी झोपण्याचं निश्चयानं टाळलं. त्या गटारात पडू नये, असं वाटलं. तो सरळ व्हरांड्यात झोपू लागला.

बायकोबरोबर सिनेमाला, फिरायला वा कुठेही जाणं त्यानं बंद केलं.

त्यानंतर प्रत्येक ठिकाणी नाम्याच तिच्याबरोबर.

लग्न होऊन सहा महिने उलटले.

सातवा महिना संपता संपता बाायको बाळंत झाली. मुलगी झाली. चाळीत बोंब झाली. जिकडे तिकडे रघूच्या बायकोचीच चर्चा. त्याचं डोकं भणाणलं. दुसऱ्या माळ्यावरून उडी टाकून जीव द्यावा, असं वाटलं.

लग्नाअगोदर कौमार्य नष्ट झालं होतं, हे ठीक होतं. ते चालण्यासारखं होतं! चालवण्यासारखं होतं? खपवून घेतलं असतं! कारण माणूस चुकतं. पण आपल्या बायकोच्या पोटात दुसऱ्याचा अंकूर! तोसुद्धा घाणेरड्या नाम्याचा! नाम्याशिवाय कुणाचा असणार? त्यासाठी तर त्यानं लग्नात एवढा खर्च केला! नाम्यानं आपल्याला फसवलं. नाम्याचा सरळ मुडदाच पाडायला हवा, असं त्याला वाटलं.

रघूनं खूप खूप विचार केला.

पण हातून काही एक घडलं नाही. तो कुणाला काही बोलला नाही. आईदेखील काही बोलली नाही. उलट तिनं सुनेचं बाळंतपण मन लावून केलं. नाम्यानं मुलीचं बारसं थाटात केलं. त्यानं मन लावून रोषणाई केली. त्याने लाऊडस्पीकर आणला. तो उत्साहाने एकेक गोष्टी घरात आणून टाकत होता. तो उत्साहानं लोकांना बर्फी वाटत होता. नाम्याचा हा बेशरमपणा त्याला बोचला. आईसुद्धा उत्साहानं इकडे तिकडे बायकांना, बाप्यांना चहा, पान वगैरे देत होती. सारा आनंद होता!

त्याला हे सहन झालं नाही. आनंद! बाहेर सारा आनंद! त्याच्या मनात दाट काळोख! हृदय कोमेजलेलं, पिळवटलेलं! तो सारा आनंदोत्सव पाहून त्याला कडवट हसूही आलं! माणसानं एवढं असं घाणेरडं असू नये!

त्याला जाणवलं! तो तिटकाऱ्यानं बाहेर पडला.

जेव्हा सारं शांत शांत झालं तेव्हा तो घरी परतला. मध्यरात्र केव्हाच उलटून गेली होती. जेवणाचा प्रश्नच नव्हता. पोटात भूकच नव्हती. त्यानं आपलं अंथरुण पसरलं. आणि आपलं शरीर जड हृदयानं झोकून दिलं.

नाम्या मात्र घरात झोपला होता.

रघूचा डोळा रात्रभर लागला नाही.

सकाळी पहाटे त्याचे डोळे जड झाले.

सकाळी घरातील सर्व माणसं उठून मोठ्या उत्साहानं कामाला लागली.

रघू त्या गडबडीनं उठलाच नाही. काय चाललंय हे त्याला कळत होतं. तरी तो खूप वेळ अंथरुणात पडून राहिला.

त्या दिवशी तो कामावर गेला नाही.

रघूला लग्नानंतर सहा महिने उलटतात तो मुलगी झाली! लोकांची चर्चा संपली नव्हती. चर्चेला तो विषयही चांगलाच! जे दुसऱ्याचं उणं ते माणसाला हवंच असतं! त्यामुळं एखाद्या माणसावर चांगल्या चोची मारता येतात! आपले दोष लपवता येतात! लोकांनी हवं नको तेही बोलून घेतलं!

काही लोकांनी तर ती गोष्ट रघूवरच ढकलली.

एके संध्याकाळी रघू येत असताना जिन्यावर त्याच्या कानावर शब्द पडले. दोन म्हातारे बोलत होते -

"अहो, येडा येडा म्हणतात, पण येडा नाय हां! बघा, लग्ना अगोदरच केव्हढं धाडस केलान्! लग्नाच्या अगोदरच! येडा म्हणतात! ते त्याला बघा बरोबर कळतं! पण एक ठीक केलान्! पोरीला फसवलान् नाय्! नायतर साले काही लोक हात वर करतात! त्या बिचाऱ्या पोरीलाच सर्व सहन करावं लागतं. कुणी आई-बाप घेतात पाडून! पण काही आईबाप देतात लोटून विहिरीत! नायतर देतात विष! घराण्याची अब्रू असते

ना!... नायतर आपली ती मुलगीच घेते विष पिऊन! मरते! तिला दुसरा मार्ग काय? ह्या शरीरामुळे ती फसते! पण ह्यानं फसवलं नाय! कमीत कमी लग्न केलान्! धाडस केलान्! पण लग्न केलान्! नायतर त्या पोरीचा जीव आज गेला असता! आज ती दिसली नसती! धाडस केलान् पण आपल्या अंगावर केलान् हे ठीक झालं! पण असं धाडस करायला नको होतं!... पण जाऊ द्या. असं होतं त्याला आपण काय करणार? आपण नाय काय असल्या गोष्टी केल्या? पण अंगावर आल्या नायत! म्हणून आपण नामानिराळे! नायतर काय?..."

त्या म्हाताऱ्यांचे हे शब्द!

त्याला वाईट वाटलं.

ते खदखद हसणारे म्हातारे त्याला डुकरं वाटली.

ते समोर दिसले की तो त्यांना हात जोडून नमस्कार करायचा. त्यानं त्यावेळी त्यांना नमस्कार केला नाही. तो सरळ त्यांच्या बाजूनं निघून गेला.

ते त्याच्याकडे काही वेळ नुसते पहातच होते. रघूला खूप वाईट वाटलं. पण थोडं कुठंतरी बरं वाटलं. त्या म्हाताऱ्यांनी त्याचा संशय घेतला. नाम्याचं नाव घेतलं नाही! तेवढीच अब्रू! घराण्याची अब्रू!

त्याला बरं वाटलं तेवढ्यापुरतं! आता कुठं कुठं त्याला खुपत होतं!

तो तळमळत होता.

नुसतं डोक्यात विचार विचार.

**नं**तर नंतर बायकोजवळ जाणंच काय, तिचा साधा स्पर्शच काय, तिच्याशी बोलणंही त्यानं टाकलं. ती काही बोलली तरी हा ऐकलंच नाही, असं दाखवायचा.

तो एकदम अबोल झाला. ताटात पडेल ते खायचं नि उठायचं. दिवसभर तो व्हरांड्यात बसून राहायचा. घरात जेवणापुरता. आणि

सकाळच्या आंघोळीसाठी.

मुलगी वाढत होती. ती रांगू लागली. ती हसू लागली. तो तिच्याकडे पाहायचा. ती गोड छान हसायची. ह्याला हसू कधी आलंच नाही. त्यानं तिला कधी उचलून घेतलं नाही. तो नुसता पहायचा. त्याच्या मनात नाना विचार यायचे! कधी त्याला एकदम त्या बालकाचा तिरस्कार वाटायचा. एकदोनदा तर त्यानं भलताच विचार केला. एवढा भयंकर विचार त्याच्या मनात येईल ह्याचं त्यालाही आश्चर्य वाटलं. एवढं क्रूर होणं चांगलं नाही, असं मनाशी म्हणून त्यानं तो विचार निकरानं मनातून पार उडवून लावला. एवढ्याश्या बालकाच्या नरडीला नख देऊन ठार करायचं, त्या कोवळ्या उमलत्या कळीला चिरडून टाकायचं! किती क्रूरपणाचं! किती वाईट! नाम्याच्या त्या कृतीपेक्षा घाणेरडं! नाम्याच्या घाणेरडेपणातून, बायकोच्या घाणेरडेपणातून त्या बालकाचा जन्म झाला ह्यात त्याचा काय दोष? ते कसं निर्मळ! असा विचार केल्यानंतर मुलीस उचलून घेऊन तिचा पापा घ्यावासा रघूला वाटलं. पण त्यानं तसं केलं नाही. ती हसत होती त्याच्याकडे पाहून! तोही तिच्याकडं पाहून मंद उदासपणे हसत होता.

तसा भयंकर विचार नंतर त्याच्या मनात कधी आला नाही.

तो बायकोकडे कधीच गेला नाही.

तरी बायकोला भराभर मुलं झाली. बायको व नाम्याविषयी त्याच्या मनात घृणा होती.

पण मुलांचा मात्र त्यानं कधी तिरस्कार केला नाही.

मुलं खरी नाम्याची, पण लोकात रघूची! जिकडेतिकडे त्यांच्या नावापुढं ह्याचं नाव! शाळेच्या रजिस्टरात, हजेरीपटावर, रेशनिंग कार्डावर ह्याचंच नाव. कसली गणती आली तरी बाप म्हणून ह्याचंच नाव!

लोकात नवरा हा!

पण प्रत्यक्षात त्याच्या बायकोचा नवरा नाम्याच झाला होता. रघूला हे पटत नव्हतं. जर बायकोला नाम्याच हवा होता, आणि नाम्याला आपली बायकोच हवी होती तर त्यांनी लग्न करायला हवं होतं. तिनं आपल्याशी एकतर लग्न करायला नको होतं. केलं, चूक झाली. ठीक आहे, चूक

झाली. पण आपल्यावर जीव नव्हता तर तिने सरळ सोडचिठ्ठी द्यायला हवी होती. सरळ सोडचिठ्ठी देऊन नाम्याचा हात धरून जायला हवं होतं. त्यात प्रामाणिकपणा होता, आहे. ते माणूसपण आहे. पण हे काय? नवरा मी! आणि नवऱ्याची सर्व कामं नाम्या करतो! हे ठीक नाही. घाण आहे. पण ठीक आहे - जगात मुलं माझी समजली जातात! नाम्यानं आपल्या बायकोला अशीच लग्न न करताच ठेवून घेतलं असतं तर? मग त्या पोरांचं बिचाऱ्या वाईट होतं. ठीक आहे, आपली तर आपली! त्यांना त्रास होऊ नये... तो मनातल्या मनात म्हणायचा आणि सारे दिवस त्याचे विचार करण्यात सरायचे.

दिवस जात होते. मुलं वाढत होती.

मुलं त्याच्याशी प्रेमानं वागायची, आपला बाप म्हणून! आपण त्यांचा बाप नाही असं त्यानंही कधी त्यांना दर्शविलं नाही. तो कधी तसा वागला नाही. शेवटी ती बिचारी मुलंच! सारी मुलं आपलीच! त्यांना एखादा जन्म लाभतो त्यात त्यांचा काय दोष? अमका जन्म लाभला म्हणून त्यांना कमी लेखलं जाऊ नये! पण असा जन्म लाभू नये! लोक त्यांना नाव ठेवतात. लोक त्यांना हसतात. म्हणजे लोकांना कळलं तर! बाप कोण हे कळलं तर! पण बाप कोण हे निश्चितपण कळतं का? हो कळतं! कळू शकतं! ते बायकोच्या प्रामाणिकपणावर जास्त अवलंबून! तो काहीसा कडवट हसायचा, पुन्हा गंभीर व्हायचा आणि विचारात बुडून जायचा!... शेवटी तो एका निर्णयावर यायचा! कुठल्याच जन्मणाऱ्या बालकाचा दोष नाही. मग त्याचा तिरस्कार कशाला करायचा? तो मुलांशी नेहमी प्रेमाने बोलायचा. रागाने कधी बोललाच नाही.

पण चाळीतली काही लोकं मुलांविषयी कुणकुणायची. रघूला खूप वाईट वाटायचं. तो चरफडायचा. कधी मनातल्या मनात एकदम धुमसायचा - "भडवा, हा नाम्या डुक्करच आहे... डुक्कर साला, घाणेरडा! त्यापेक्षा वेश्येकडं जावं माणसानं! ते चांगलं! शरीराला रोग झाले तरी ते चांगले! मन तरी साफ!"

नाम्याला तो मनातून शिव्या द्यायचा.

"आणि ह्या डुकरिणी!" आईला, बायकोला तो उद्देशून म्हणायचा, पण मनातच!

चौथा मुलगा झाला!

घरात आनंदी आनंद!

पुन्हा थाटात बारसं!

नाम्यानं बाळंतपणातच बायकोचं ऑपरेशन करून घेतलं. पुन्हा मुलं होऊ नयेत म्हणून!

नाहीतर आणखी मुलं होतच राहिली असती! आणि ते नाम्याला खर्चाच्या दृष्टीनं परवडण्यसारखं नव्हतं! आणि आपली बायको त्याला तर हवी होती.

तो खूप चरफडला.

नंतर नंतर त्याला बायकोच्या हातचं खाणं घाण वाटू लागलं.

कामावर जाताना त्याला ती कागदात चपात्या बांधून द्यायची. नुसत्या जाड्या भरड्या चपात्या! तो मग ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये उसळ किंवा सांबार घेऊन त्या चपात्या खायचा. तरी कामावर येताना तो एकदोन चपात्या कुत्र्यांना किंवा भिकाऱ्यांना देऊन यायचाच. उरलेल्या मग तो खायचा. पण आता त्याला बायकोनं दिलेल्या चपात्या खाण्याची इच्छाच उरली नव्हती.

मग तो कामावर लवकरच निघायचा. रस्त्यावरची कुत्री दिसतात का पहायचा. खरं म्हणजे कुत्रीच त्याला पाहून त्याच्याकडं शेपटी हलवत यायची. त्याच्यावर उड्या मारायची. त्याला चाटायची. तो सर्व चपात्या त्यांना खाऊ घालायचा. खाऊन झालं की सारी कुत्री त्याच्या सभोवती जमायची! शेपूट हलवून त्याचा हात, पाय, गाल, मान चाटायची! तोही त्यांना, त्यांच्या पिल्लांना जवळ घेऊन कुरवाळायचा. अर्धा पाऊण तास त्याचं हे चालायचं. मनात सारा आनंद! कुत्र्यांचं प्रेम पाहून आनंद! कुत्रीच आपली मुलं, त्याला वाटायचं! साऱ्या कुत्र्या मांजरांसाठी आपण कमवावं, त्यांना खाऊपिऊ घालावं, असं त्याला वाटायचं! पण लोकच किती क्रूर! किती निष्ठूर! कुत्र्यांएवढं प्रेमतरी! आपण नुसती चपाती घालतो ह्या कुत्र्यांना! ती विसरली नाहीत! कधी नसते आपल्याकडं चपाती! ती रागावत नाहीत!

येतात शेपूट हलवत! मारतात आपल्यावर उड्या, चाटतात आपल्याला आणि न रागावता जातात! पण माणसं! काही लोक कुत्र्यांना उगाच मारतात! उगाचच! - तो खूप विचार करायचा आणि शेपटं हलवणाऱ्या त्या कुत्र्यांकडं नुसता पहातच राह्यचा! रस्त्यावरचे जाणारे - येणारे लोक पुटपुटायचे -

"वेडा झाला बिचारा!"

कुत्र्यांकडे पाहून पाहून त्याचं मन भरून यायचं. पण आपण काय करणार? त्याच्या मनात प्रश्न यायचा. हताशपणे तो आकाशात पहायचा! आकाशात पक्षी विहंगत असायचे! त्यांच्याकडे पाहून त्याचं मन हरखायचं! त्यांचं आपलं बरं! आयती फळं मिळतात! आयते दाणे मिळतात! पण ह्या कुत्र्यांचं काय? आपलं काय? - तो पुटपुटायचा आणि जड पावलांनी चालू पडायचा.

पैसे असलेच तर वडापाव, वडासांभार वगैरे तो खायचा. नाहीतर दिवसभर उपाशीच! पण मनात एक मोठं समाधान! कुत्र्यांनी प्रेमानं चाटल्याचं!

नंतर नंतर त्याची भूक साफ मेली.

जगण्याची वासनाही मेली.

मरण्याचं तर भय मुळीच राहिलं नाही.

तो कसातरी जगायचं म्हणून जगत होता. हृदयाची टिक्‌टिक् चालू होती म्हणून जगत होता.

एक दिवस तो कामावरून येत होता. चाळीचा जिना तो अर्धा चढला आणि त्याच्या कानावर शब्द पडले. रघू तसाच थबकून तिथल्या तिथं चोरासारखा कान टवकारून उभा राहिला. चाळीतली तरुण टवाळ पोरं बोलत होती -

"अरे ही नाम्याची बायको की रघूची?"

"रघूचीच!"

"कशी काय?"

"ती नवरा म्हणून नाव कुणाचं लावते?"

"रघूचं!"

"मग ती रघूचीच बायको"

"अरे पहावं तर नाम्याच तिच्याबरोबर बाजाराला! नाम्याच तिच्याबरोबर सिनेमाला! नाम्याच तिच्याबरोबर नेहमी फिरायला! नेहमी जिकडे तिकडे नाम्याच तिच्याबरोबर असतो!"

मोठा हास्य-कल्लोळ!

"पण रघूची पोरं खरी नाम्याचीच!"

"कशावरून?"

"रघू नेहमी व्हरांड्यात झोपतो! नाम्या आणि रघूची बायको आतल्या खोलीत झोपतात! आम्ही हे पाहतो!"

"आणि रघूच्या पोरांचे चेहरे नाम्यासारखेच वाटतात!"

"चेहऱ्यावरनं काही खरं नाही! मी वाचलंय एके ठिकाणी! एखादा चेहरा गरोदर बाईनं सतत पाहिला तर मुलाचा चेहरा त्या माणसासारखा होतो! मुलाचा चेहरा आपल्या पणजोबासारखाही असू शकतो! आणि तो कित्येक वर्षे अगोदरच मेलेला असतो! एखाद्या मुलाचा चेहरा आजोबासारखा दिसतो! एखाद्या मुलाचा चेहरा चुलत्यासारखा दिसतो! म्हणून ह्या लोकांचा संशय घ्यायचा का?..."

"ते काही असो! तरी रघूच ह्या पोरांचा बाप!"

"कसा काय?"

"त्यांच्या नावापुढं बघा! बाप म्हणून नाव कुणाचं आहे? - शाळेच्या रजिस्टरात बघा! रेशनिंग-कार्डावर बघा! रघू मेल्यावर त्याच्या इस्टेटीचे वाटेकरी कोण होतील ते! रघूच त्यांचा बाप!"

"जाऊ दे रे, च्यायला, कोणीही असू दे त्यांचा बाप!"

"जाऊ द्यात त्या गोष्टी! विचार करवत नाही! कुणाचा बाप कोण हे निश्चित सांगता येत नाही!"

"सांगता येतं!"

"आपल्या बाप-लोकांचं तरी आपल्याला निश्चित सांगता येईल का?"

"येईल!"

"कसं काय?"

"आपल्या आया आपल्या बाप लोकांशी प्रामाणिक असल्या की सांगणं कठीण नाही!"

"ते आपण कसं काय ठरवायचं? आपल्याला काय माहीत?"

"आपल्या आया आपल्या बापाशी एकनिष्ठ, प्रामाणिक असल्या की आपले बाप हे आपलेच बाप!"

"पण आपले बाप आपल्या आयांशी एकनिष्ठ नसले तर आपल्या आयांनी त्यांच्याशी एकनिष्ठ म्हणून का राहावे?"

"बापांनीदेखील राहावे! पण आयांनी आपल्या मुलांसाठी तरी राहावे!"

"पण मला वाटतं अशी लग्नंच होऊ नयेत! ही काय लग्नं नव्हेत!"

"बरोबर!"

"ते शेक्सपिअरचं सॉनेट आठवतं का? मॅरेज ऑफ टू माइंड्स्? लग्न म्हणजे दोन मनं एकरूप व्हायला हवीत."

"च्यायला, तुला ते फर्स्टइयरला असलेलं सॉनेट आठवलं आता! कमाल आहे?"

"अरे पण हा फर्स्टइयर पासही झाला नाही!"

"पास होणं मरू दे. एक विचार तर राहिला ना मनात!"

"जाऊ दे! आम्ही तरी इंटरला किती गटांगळया खाल्ल्या! आणि इंटरच्या पुढे गेलोच नाही!"

"च्यायला, ह्या चाळीत राहून आपण काय अभ्यास करणार? तसं वातावरण तरी आहे का? एका खोलीत हजार माणसं गुराढोरांसारखी! आणि चाळीत कधी शांतता नाही! दरदिवशी भानगडी! मग त्याच गोष्टी"

"अरे पण तो श्रीधर ह्याच चाळीत राहून शिकलाच ना!"

"त्याची कमाल आहे! त्याला मानतो आपण!"

"पण ते अभ्यासाचं सोडा! च्यायला, आपलं काय डोकं तेवढं राहायलं नाही."

"सोडा कसं? आपणही काहीतरी करायला हवं होतं. श्रीधर एवढ्या परिस्थितीत शिकला! ते आपण का शिकलो नाही?"

"सोड रे यार ते? तेवढी ताकद सर्वांनाच नसते!"

"ते तू काय म्हणत होतास! ते शेक्सपिअरचं!"

"एकनिष्ठ मनांचं लग्न!"

"यस! पण अशी लग्नं असतात का?"

"असतात! आणि ती नसली तर माणसानं लग्नंच करू नये. असेच संबंध ठेवावे. मुलं होऊ देऊ नयेत! मुलांना कशाला त्रास! त्यांना कशाला वेदना?"

"यस यस! अशी लग्नं होऊ नयेत!"

"नाही रे, पण समाजात मुलींवर मुलांवर आईबापांची दडपणं येतात. मग देतात कुठलाही मुलगा वा मुलगी गळ्यात बांधून!"

"मुलामुलींनी ही दडपणं झुगारून द्यावीत!"

"ते एक ठीक आहे. दडपणं झुगारलीसुद्धा जातील. पण काही मुलं-मुली स्वतःच्या पसंतीनं सर्व पैसा वगैरे पाहून लग्नं करतात आणि नंतर एकमेकांना फसवत असतात, त्याचं काय?"

"काहींना ती खाजच असते!"

"खाज असते तर त्यांनी लग्न करू नये. लग्न न करता हजार पुरुष घ्यावेत उरावर आणि पुरुषांनी जावे वेश्यांकडे."

"हे चांगलं! खरोखर चांगलं! आपल्याला पटलं!"

"अरे काही पुरुषांनी आपल्या बायकांमुळे आत्महत्या केल्या आहेत."

"काही बायकांनीदेखील!"

"काहींनी खूनदेखील!"

"रघूनं अजून आत्महत्या कशी केली नाही?"

मोठा हास्यकल्लोळ झाला आणि त्यांचं बोलणं थांबलं. नंतर कुणी काहीएक बोललं नाही. रघू काही वेळ थांबला. कुणी काही एक बोलत नाही हे पाहून तो हळूहळू जिना चढून वर आला.

ती पोरं तशीच शांत उभी होती. त्यांनी रघूकडं, एकमेकांकडे पाहिलं

आणि ती खुसखूस हसली.

रघूनं त्यांच्याकडं पाहिलं नाही. पण मनाला फार वेदना झाल्या. आपण वेडेच व्हायला हवं होतं, असं त्याला वाटलं.

दुसऱ्या मजल्यावर आला तेव्हा त्याला धापा लागल्या. डोळ्यांना पाणी आलं. नकोनकोसं वाटलं जीवन. .

मुलं पुढं आली. त्यानं त्यांच्याकडे मोठ्या कणवेनं पाहिलं. हृदयात एक वेदना ढवळून आली.

रघूच्या कानावर जे टवाळ पोरांचे शब्द पडले त्यांनी तो फारच अस्वस्थ झाला. त्या रात्री तो जेवला नाही. दुसऱ्या दिवसापासून त्यानं कामावर जाण्याचंही सोडून दिलं.

रघूला साऱ्या गोष्टी आठवल्या. त्याचं डोकं घिरटलेलं. तो तसाच पारावर बसून राहिला वेड्यासारखा! जगाच्या दृष्टीनं तो वेडा! डोकं कामातून गेलं! पण त्याच्या डोक्यात साऱ्या आठवणी!...

थोरली मुलगी समोरच्या चाळीतल्या श्रीधरबरोबर पळून गेली! ह्या नाम्यानं तिला जबरदस्तीनं परत आणली. कारण? - त्याची अब्रू जात होती. ह्याची जात बुडत होती! ह्याचं नाव जात होतं! श्रीधर किती चांगला पोर! आणि देखणाही! बी.ए. झालाय! चांगली नोकरी करतो. थोरली मॅट्रिकला बसलेय. तिचा बसला जीव त्याच्यावर! काय झालं असतं तिनं त्याच्याशी लग्न केलं असतं तर? काय वाईट होतं? - पण तो हलक्या जातीतला! नाम्या उच्च जातीतला! हलकी जात आणि उच्च जात! एका

ठराविक कुटुंबात जन्म घेतल्यामुळे नाम्या उच्च जातीतला आणि श्रीधर नीच जातीतला! श्रीधरच्या चपलेशीही उभं राहण्याची नाम्याची लायकी नाही! पण नाम्याची उच्च जात! त्यामुळे तो श्रीधरपेक्षा श्रेष्ठ! अशी ही जात! उच्च जात! ती थोरलीनं श्रीधरशी लग्न करण्यानं बुडणार होती! नाम्या जे काय करतोय, त्यानं जे काय केलं, त्या गोष्टींनी त्याची जात बुडाली नाही! साल्याची उच्च जात! असल्या घाणेरड्या माणसाच्या पोटी डुकरानंदेखील जन्मू नये... असं म्हणून तो थुंकला.

त्याला श्रीधरचं वाईट वाटलं. थोरलीचं नि श्रीधरचं लग्न झालं असतं तर थोरली सुखी झाली असती. पण श्रीधरची जात आडवी आली. श्रीधरची नीच जात! नाम्याची उच्च! नीच आणि उच्च! आणि नाम्याची उच्च जात! ती कशी काय?... हे काहीतरीच!

तो मनातच हसला.

पुन्हा डोक भिरभिरलं.

थोरली श्रीधरबरोबर पळून गेली, त्याविषयी कुणाला एवढं काही वाटलं नाही. तिला परत घरी आणावं, असं आपल्या बायकोलाही वाटलं नाही. आपली बायको?.. जाऊ दे... पण थोरली पळून गेली ह्याचं तिला बरंच वाटलं असावं! श्रीधरएवढा चांगला नवरा नाम्या थोरलीला कुठून पाहून देणार!... तिला बरंच वाटलं असावं. पण ह्यानंच, ह्या नाम्यानं दुसऱ्या दिवशी रात्री आपण काय मोठी बहादुरी केलीय ह्या ऐटीत थोरलीला घरी आणलं. आपल्या बायकोस ते काही बरं वाटलं नाही, असं दिसलं.

सर्व चाळ सामसूम होती. मध्यरात्र उलटलेली होती. आई दरवाजाची कडी वाजल्यावर जागी झाली होती. तरी ती अंथरुणावर पडूनच राहिली. थोरलीला पाहून तिलाही काही बरं वाटलं नाही.

बायको नाराजीनं नाम्याला म्हणाली -

"कशाला आणलंत तिला? तिला तर जो मनापासून पसंत होता तर करू द्यायचं होत लग्न त्याच्यापाशी? आता कोण एवढं जातपात मानतंय? आणि शहरात कुठं जातपात मानायची?"

आईनं हुंकार देऊन बायकोला साथ दिली आणि म्हणाली, "श्रीधर

चांगला शिकला सवरलेलाही होता!"

ह्यावर तो नीच नाम्या काय म्हणाला? तो हलकट माझ्यादेखत बेशरमपणे म्हणाला -

"मी झाड लावलंय! त्याची फळं हवी तर मी खाईन पण नीच जातीत तिला पडू देणार नाही!"

बायको गप्प झाली. आईतर त्याच्याकडे आश्चर्याने पहातच राहिली. काही एक बोलली नाही.

आपल्या अंगाचा इतका भडका उडाला की काय करू नि काय नको, असं झालं. नाम्याच्या नरडीचा घोट घ्यावासं वाटलं. थोरली त्याची मुलगी! मी म्हणत नाही माझी म्हणून! पण आपल्याच मुलीविषयी बापानं असं म्हणावं? आपल्या मुलीविषयी अशी भावना ठेवावी? एवढं माणसानं घाणेरडं व्हावं? हे माणूसपण? असा विचार नाम्यानं बोलून दाखवावा कसा? मनाचाच नाम्या नीच! आणि परत त्याची जात उच्च!

नाम्या नीचच आहे. त्यानं बोलून दाखवलं म्हणजे त्याच्या मनात तो विचार असेलही! तो एवढ्या खालच्या थराला जाऊही शकतो! त्याची ती मुलगी! पण आपली बायको ही त्याची लग्नाची बायको कुठं? त्याच्या बायकोची पोरं हीच फक्त त्याची पोरं! असंही तो नीच मानत असेल! जनावरं मग बरी! नाम्या जनावरापेक्षा जनावर आहे. त्याचं ते बोलणं असह्य झालं. तो विचारच असह्य झाला. सहन होत नाही. सहन होणार नाही.

नाम्याचा बेशरमपणा आता अधिकच वाढलाय. तो आणि आपली बायको आता बाहेरच्या खोलीत झोपतात. आईदेखील त्याच खोलीत. सर्व चाळे आईच्यादेखत राजरोस! आई काय करणार? तिला नाम्याला बोलायला तोंड कुठं आहे? थोरली आतल्या खोलीत झोपते. ती तरी काय करणार? स्वतःच्या आईचे चाळे स्वतःच्या डोळ्यांनी कसे पहायचे? आईला लाज नाही. तिला पहावत नसतील ह्यांचे चाळे! तिला लाज वाटत असेल. त्यात जबरदस्तीनं नाम्यानं तिला घरी आणलं. श्रीधरवर तिचा जीव होता, आहे. कशाला आणायचं तिला ह्या अशा घरी? सारा तिचा कोंडमारा झाला असेल!

श्रीधरशिवाय जगण्यात थोरलीला अर्थ वाटला नसावा. तिला असह्य

झालं असावं.

दुसऱ्या दिवशीच तिनं डायझोन पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ती बेशुद्ध पडली. विष प्यालेय हे लक्षात आलं तरी भडव्या नाम्यानं हालचाल केली नाही. कुणी हालचाल करीत नाही हे पाहून आपणच गुपचूप डॉक्टरकडं गेलो. डॉक्टरला सर्व काही समजावलं. डॉक्टर मोठ्या, लगबगीनं लागणारी साधनं, इंजेक्शनं आपल्या बॅगेत घेऊन निघाला. डॉक्टरनं लागलीच एक इन्जेक्शन थोरलीच्या दंडात खुपसलं. तोंडावाटे उलट्या काढल्या. धोका टळला. थोरलीचा जीव वाचला. नाहीतर पोर जाणार होती. थोरली तशी किती सुंदर! वागायला चांगली! तशी आपली नाही, तरी जीव तडफडला! ती मरू नये! कुणीही मरू नये! चांगलं माणूस मरूच नये! पण वाईटही मरावं, असं आपल्याला वाटत नाही! त्याला मारावं, असंही वाटत नाही! पण त्यानं चांगलं वागावं, त्यानं घाणेरडंपण टाकावं, असं वाटतं! नाम्याला मारण्याची आपली मुळीच इच्छा नाही! तो मरावं अशीही नाही. पण त्याचं घाणेरडंपण पटत नाही. ते सहन होत नाही. ते संपायला हवं. ते खलास करावंसं वाटतं.

**रा**त्र झाली.

तो तसाच पारावर बसलेला.

थोरली आली आणि आर्जवानं म्हणाली, "बाबा, जेवायला चला ना!"

तिच्या शब्दांमधला आर्जव, प्रेम त्याला जाणवलं. त्यानं तिच्याकडं पाहिलं. काळोखातून तिच्या शरीराचा बांधा त्याच्या डोळ्यांना स्पष्टपणे जाणवत होता. तिच्या शरीराचं सुडौलपण, भरलेपण त्याला प्रकर्षानं जाणवलं. ती रूपवान होतीच, पण ती तारुण्यानं ओसंडलेली होती. तिचं सारं शरीरच तारुण्यानं ओसंडलेले होतं. नाम्याच्या मनात नेमकं तिचं शरीर असावं! तो नीच शरीरापलिकडे कधी जाऊच शकत नव्हता...

रघूला एकदम भीती वाटली... नाम्यातलं जनावर जागं व्हायचं! तो अस्वस्थ झाला. तिच्या तारुण्यानं ओसंडून वाहणाऱ्या देहाकडं काही वेळ चिंतायुक्त नजरेनं पहातच राहिला. काय बोलावं, त्याला काही वेळ कळलंच नाही. शेवटी तो म्हणाला -

"नको, नको. मला घाण खायची नाही!"

"जेवण म्हणजे घाण का बाबा?"

"होय घाण! तिच्या हातचं जेवण म्हणजे घाणच! मला आता घाण खायची नाही! तू त्यांना सांग, मला भूक नाही आणि खरोखर मला भूक नाही ग! खरोखर नाही. माझी भूक मेलेय ग!"

"बाबा, असं काय करता?... बघा तुमची तब्येत कशी झालेय! काहीबाही व्हायचं!"

"होऊ दे ग! मरेन फार तर! हे शरीर पडेल! पण बघ, मन अजून मेलं नाही! शरीर खंगलं! एके दिवशी ते पडेलही! आणि हे बघ, मेलो तर बरं होईल! सर्व सुटतील! मीही सुटेन! माझी कशाला मधे अडचण!"

"बाबा, नका हो असं बोलू! आमच्यासाठी तरी तुम्ही जगा! तुमच्या मुलांसाठी!"

"माझ्या मुलांसाठी?" तो उद्गारला, आणि एकाएकी गप्प झाला. हृदय गहिवरून आलं. नाम्या बाप, पण बापासारखा पोरांशी वागत नाही. पोरांना हवं नको ते आणतो, खाऊ पिऊ घालतो! पण प्रेमाचा ओलावा त्याच्या हृदयात नाही!

काहीवेळानं तो म्हणाला, - "जगेन, जगेन! जगण्याचा प्रयत्न करीन. तुमच्यासाठीच जगेन जगलो तर!"

"बाबा, पण चला ना जेवायला! माझ्यासाठी तरी चला. एकच घास खा हवा तर! दुपारीदेखील जेवला नाहीत बरोबर! एकाएकी उठलात ताटावरून! काय झालंय तुम्हाला? तब्येत बरी नाही का?"

"तब्येतीला काय झालंय?"

ह्या पोरीला कसं सांगायचं आपल्याला काय होतंय ते? - त्यानं मनाशीच म्हटलं.

तो गप्प बसला.

"चला. एक घास खा!"

"खरोखर नको! एक घास खाल्ला तरी उलटी होईल! मला मग त्रास होईल! तुला चालेल का?"

"ती माणसं झोपतायत! अंथरुणं घातलेयत!"

"अंथरुणं घातलेयत?"

"हो!"

"माझं अंथरुण?"

"ते आहे कायम व्हरांड्यात!"

"मग तू जा! काही काळजी करू नको. खरोखर पोटात भूक नाही. झोप आली की येईन! जा, जा, तू माझ्या बाळा, जा! काही काळजी करू नको!"

थोरली निराशून गेली.

त्यानं तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पाहिलं आणि त्याचं डोकं घिरटलं.

पोरीचा सारा देह तारुण्यानं मुसमुसलाय. सर्व अंग कसं रेखीव आहे! ईश्वरानं तिच्यावर सौंदर्याची खैरातच केलेय! एवढं असून पोर गरीब आहे. वागणं कसं नम्र! मनानं साधी आहे बिचारी! अजाण आहे. एवढ्याशा वयात नाम्यासारखी माणसं ती कशी ओळखणार? नाम्याच्या मनात काय चाललंय, त्याचे बेत काय असावेत, हे त्या पोरीला कसं कळायचं? ह्या गरीब सरळ पोरीवर नाम्या अत्याचार करायचा एखाद दिवशी! नाम्या तेवढा जनावर आहे! जनावरंही एवढी वाईट नसावीत! एवढा नाम्या हलकट, नीच आहे! माझ्या देखत काय म्हणाला? - आपण झाड लावलंय! म्हणजे स्वतःच्या मुलीवर! कुत्री-मांजरं वागत असतील असं! गायी-गुरांमध्ये चालत असेल हे! पण माणसानं असा विचार करावा? नाम्या माणूस नाही. असं काही घडलं तर नाही सहन होणार! नाही सहन होणार! नाही! नाही! असं घडू नये. पण घडलंच तर? तर!... नाम्याचा जीव घेण्याची तशी आपली काय इच्छा नाही. तसा विचारही नाही मनात! पण त्याच्या घाणेरडेपणाची हद्द तिथपर्यंत गेली तर?... तर! तर!... तर मग आपला इलाज नाही. त्याचं घाणेरडंपण संपवलंच पाह्यजेल.

त्यानं वर पाहिलं.

घरातला दिवा मालवला गेला होता. सर्व शांत झालं होतं. त्याच्या डोळ्यावर झोप येऊ लागली होती. थकवाही वाटत होता. पण भूक मात्र पोटात मुळीच नव्हती.

आपलं अंथरुण पोरीनं व्हरांड्यात पसरलं असेल. आई झोपली असेल भिंतीच्या कडेला, भिंतीकडे तोंड करून दुसऱ्या भिंतीला लागून नाम्या आपल्या बायकोबरोबर!

उठता उठता त्याच्या डोक्यात विचार येऊन गेले.

उकाडा होता. तरी त्याला आश्चर्य वाटलं. दार उघडं होतं! पोटभरून पाणी पिऊन घ्यावं, त्यानं विचार केला. तो पायांचा आवाज न करता खोलीत आला. खोलीभर नजर फिरवली. खोलीत फक्त आई, बायको आणि मुलं! सर्व गाढ झोपलेली! नाम्या खोलीत नव्हता. आतल्या खोलीचं दार बंद होतं. आतल्या खोलीतल्या देवाच्या निरांजनाचा मंद प्रकाश भिंतीवरून दिसत होता. त्यानं कानोसा घेतला. आतल्या खोलीतून बांगड्यांची किण किण ऐकू येत होती. मध्येच सळसळ! आतल्या खोलीत काहीतरी चाललंय, हे त्याला जाणवलं. रघूच्या उरात एकदम धस्स झालं. सारं रक्त एकदम उसळलं. अंगात एकदम काहीतरी संचारून आलं.

पायांची चाहूल न देता तो पुढे सरकला. घरातलं उंच स्टूल कुठं दिसतंय का, ह्या करिता त्यानं आपली नजर सर्व कान्याकोपऱ्यातून जलदपणे फिरवली. स्टूल एका कोपऱ्यात होतं. त्यानं ते स्टूल अलगद काही एक खाटखूटही न करता उचललं आणि आतल्या खोलीच्या भिंतीपाशी ठेवलं. शिताफीनं तो त्यावर चढला आणि हळूच सावकाश डोकं वर नेऊन त्यानं खोलीत पाहिलं. त्याच्या नसा नसा रागानं पेटल्या. डोळे ताठरले. थोरलीची आणि नाम्याची झटापट चालली होती. नाम्या पिसाटला होता! थोरली

साऱ्या शक्तीनिशी विरोध करीत होती. आणि हे देवासाठी लावलेल्या निरांजनाच्या मंद प्रकाशात चाललं होतं ! देवापुढं सकाळ-संध्याकाळ निरांजन लावण्याचं कामही नाम्याचंच !

रघूच्या अंगाचा एकदम भडका उडाला. दात-ओठ खाऊन तो खाली उतरला. त्यानं मुठी आवळून इकडं तिकडं पाहिलं. त्याला काहीतरी हवं होतं. भरभर त्याची नजर फिरली. मसाला वाटण्याचा पाटा नजरेत आला. लागलीच त्यानं तो सहजपणे उचलला. मनगटात शक्ती संचारली होती ! पाटा खांद्यावर घेऊन तो अलगद स्टुलावर चढला.

झटापट चालूच होती. थोरली अद्याप नाम्याच्या वासनेला शरण गेली नव्हती. ती आपल्या शक्तीनिशी नाम्याला विरोध करीत होती. पण नाम्याच्या बळकट दंडांपुढे, दणकट मनगटांपुढे थोरलीचं काही चालण्यासारखं नव्हतं. ती थकलीही होती. तिला धापा लागल्या होत्या. नाम्यानं अखेर थोरलीला खाली पाडलं. थोरली एकदम निश्चेष्ट पडली. नाम्या ताठ उभा ! ती निश्चेष्ट पडलेली तरी नाम्याचे डोळे वासनेनं पेटलेले ! काही क्षण तो गिधाडसारखा तिच्या देहाकडे पहातच होता ! नंतर तो त्या पेटलेल्या डोळ्यांनी थोरलीकडे हळूहळू सरकू लागला.

रघूनं सारी शक्ती एकवटून नेम धरून पाटा फेकला.

एकदम एक आर्त भयाण सारी चाळ दणाणून सोडणारी किंकाळी !

दुसऱ्या क्षणात नाम्या रक्ताच्या थारोळ्यात ! सारे हातपाय तडफडले ! काही क्षणांतच नाम्याचं शरीर निश्चेष्ट झालं.

रघूनं नाम्याच्या देहाकडं क्षणिक पाहिलं. त्याला वाईट वाटलं आणि समाधानही !

वाईट, एक प्राण घेतल्याचं !

समाधान, एक घाण काढून टाकल्याचं !!

❖❖❖

Indian Institute of Advanced Study
G-5260
30/10/02
SHIMLA

**अनघा प्रकाशन, ठाणे.**

**कादंबऱ्या**

- **फणा** - अनंत कदम
- **नामरूप** - अनंत कदम

**मुलांसाठी**

- **बालसंस्कार**
- **वेदमाता गायत्री**
- **श्रीस्वामी समर्थ गुरू-शिष्य कथा** (भाग-१)

**आगामी प्रकाशने**

- **श्री गायत्री माता**
- **श्रीस्वामीसमर्थ गुरू-शिष्य कथा** (भाग-२)
- **जन्मखुणा** - प्रल्हाद आवळसकर (कादंबरी)
- **?** - प्रल्हाद आवळसकर (कथासंग्रह)
- **क्षितिजापलीकडे** - डॉ. भाल पाटील (कादंबरी)
- **उत्तरक्रिया** - ज्ञानेश्वर महाराव (लेखसंग्रह)

Library IIAS, Shimla
MR 891.463 K 114 F
G5260

**अमोल वितरण**

१६, सदिच्छा, मीठबंदर रोड, चेंदणी,
ठाणे (पूर्व) ४०० ६०३. **दूरध्वनी** - ५४० ७३६२